मा. इंजि. अतुल कपोले (कार्यकारी संचालक) सेवापूर्ती गौरव विशेषांक

अतुलनीय

संपादक : विजयकुमार मोरे

विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स, कान्हे, मावळ,जि. पुणे

मा. इंजि. अतुल कपोले (कार्यकारी संचालक) सेवापूर्ती गौरव विशेषांक

संपादक
विजयकुमार रामचंद्र मोरे
इलाईट ग्रीन एकर्स, महिंद्रा कंपनीसमोर,
टाकवे रोड, जांभूळ, ता.मावळ, जि. पुणे
मोबाइल ७९७२८१६१८०

मुद्रक
विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स प्रा.लि.
गट नं. ४४५, शनि मंदिराजवळ, कान्हे,
ता.मावळ, जि. पुणे ४१२१०६
मोबाइल ७९७२८१६१८०

प्रकाशक
मा.इंजि.अतुल कपोले सेवापूर्ती गौरव समिती
गट नं. ४४५, शनि मंदिराजवळ, कान्हे,
ता.मावळ, जि. पुणे ४१२१०६
मोबाइल ७९७२८१६१८०

टाइपसेटींग व सजावट
सक्षम ग्राफिक्स, कान्हे
ता.मावळ, जि.पुणे ४१२१०६

किंमत १०० रु.

प्रकाशन : फेब्रुवारी २०२६

मा. इंजि. श्री अतुल अशोक कपोले

कार्यकारी संचालक : कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे

अनुक्रमणिका

१) मुख्यमंत्री शुभेच्छा	मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस	६
२) शुभेच्छा संदेश	मा.ना. श्री गिरीष महाजन	७
३) शुभ संदेश	मा.इंजि. डॉ. संजय बेलसरे	८
४) प्रस्तावना : अतुलनीय	मा. इंजि. मिलिंद नाईक	९
५) संपादकीय : सामाजिक जाणिव असलेला अभियंता	श्री विजयकुमार मोरे	१३
६) साहेबांसोबतचा अविस्मरणीय कार्य अनुभव	मा.इंजि. दिनेश शेवाळे	१६
७) चतुरस्त्र नेतृत्व करणारा अधिकारी	श्री वाय.सी. पाठक	१८
८) कपोलेसाहेब एक दीपस्तंभ	मा. इंजि. विनायक जाधव	१९
९) आदरयुक्त दरारा असलेले व्यक्तिमत्व	मा.श्री संजय अनपट	२४
१०) सर्वगुण संपन्न अभियंता	मा. इंजि. अजित शिंदे	२६
११) आदर्श व्यक्तिमत्व	मा. इंजि. विनोद मुंजाप्पा	२८
१२) अतुल म्हणजे अतुलनीय, अजोड	मा.इंजि. रवि भा. पवार	२९
१३) अतुलनीय कार्याचे रहस्य	मा.इंजि. निलेश पाटील	३१
१४) एक प्रगल्भ व प्रतिभावान अभियंता	मा.इंजि. राजेंद्र काळे	३४
१५) एक उत्तम प्रशासक	मा.इंजि. अमोल फुंदे	३५
१६) कार्यालयाचे कुटुंब प्रमुख	मा.श्री हेमंत शिनगारे	३८
१७) उच्च तांत्रिक ज्ञान असणारा अभियंता	मा.इंजि. राजेंद्र धोडपकर	३९
१८) मार्गदर्शक आणि आधारस्तंभ	मा.इंजि. संदीप नलावडे	४१
१९) ध्येयवादी अधिकारी	मा. इंजि. मनोज अवलगावकर	४३
२०) अतुल्य व्यक्तिमत्व	मा. इंजि. दी.रं. कंदी	४५
२१) एक परिपूर्ण अभियंता	मा. इंजि. राम घोटे	४७

मा.इंजि.श्री अतुल अशोक कपोले
कार्यकारी संचालक
कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे

अल्प परिचय

संपुर्ण नाव : श्री अतुल अशोक कपोले

जन्मगाव : चाळीसगाव, ता.चाळीसगाव, जि. जळगाव

प्राथमिक/माध्यमिक शिक्षण : भुसावळ, जि. जळगाव

अभियांत्रिकी पदवी : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

राज्य लोकसेवा आयोग

परीक्षा उत्तीर्ण वर्ष : १९९३

प्रथम नियुक्ति : सहाय्यक कार्यकारी अभियंता श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर

कार्यकारी अभियंता : स्थानिक स्तर, छत्रपती संभाजीनगर (१९९७)

कार्यकारी अभियंता : नांदूर मध्यमेश्वर कालवा क्र.२ (१९९९ ते २०००)

कार्यकारी अभियंता : पाटबंधारे प्रकल्प मजबुतीकरण उमरगा (२००० ते २००४)

कार्यकारी अभियंता : ल.पा. विभाग क्र.१, औरंगाबाद (२००५ ते २००६)

कार्यकारी अभियंता : कोयना संकल्पचित्र विभाग, पुणे (२००८ ते २०११)

कार्यकारी अभियंता : चासकमान प्रकल्प विभाग, पुणे (२०११ ते २०१३)

अधीक्षक अभियंता : पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे (२०१२ ते २०१३)

अधीक्षक अभियंता : पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे (२०१३ ते २०१७)

उपसचिव, मंत्रालय : सिंचन व्यवस्थापन, (२०१७ ते २०१९)

मुख्य अभियंता

दक्षता व प्रकल्प : सहसचिव, मंत्रालय (२०१९ ते २०२१)

कार्यकारी संचालक : कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे (२०२१ ते २०२६)

कार्यकारी संचालक : महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे (२०२१ ते २०२५)
(अतिरिक्त कार्यभार)

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

सत्यमेव जयते

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
महाराष्ट्र

जा.क्र/मु.मं.स/ज.क./०५/२०२६
दि. १३ जानेवारी, २०२६

शुभेच्छा

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक इंजि. श्री. अतुल कपोले यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने सेवापूर्ती विशेषांक प्रकाशित होत असल्याचे समजून आनंद झाला. राज्य शासनात त्यांनी तीन दशकांहून अधिक काळ बजावलेल्या सेवेचा या माध्यमातून होत असलेला गौरव महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

श्री. कपोले यांनी कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मंत्रालयात उपसचिव, सहसचिव आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, अशा विविध पदांवर कर्तव्य बजावले आहे.

जलसंपदा विभागांतर्गत गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, अशा तीन महामंडळांमध्ये कार्यरत असताना त्यांनी अनेक प्रकल्पांना गती देण्यासाठी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. सांघिक प्रयत्नातून सकारात्मक परिणाम घडवून आणण्याची त्यांची कार्यपद्धती तरुण अभियंते व अधिकारी यांच्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास वाटतो.

सेवानिवृत्तीनंतरच्या निरामयी आणि आनंदी आयुष्यासाठी श्री. कपोले यांना तसेच यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या सेवापूर्ती विशेषांकाच्या प्रकाशनास मन:पूर्वक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, ई-मेल : cm@maharashtra.gov.in
वेब साईट : www.maharashtra.gov.in

मंत्री
जलसंपदा (विदर्भ, तापी व
कोकण खोरे विकास महामंडळ),
आपत्ती व्यवस्थापन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
www.maharashtra.gov.in

दिनांक : ०९ जानेवारी, २०२५

शुभेच्छा संदेश

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक इंजि. श्री. अतुल कपोले आपल्या हे नियत वयोमानानुसार फेब्रुवारी २०२६ मध्ये सेवानिवृत होत आहेत. त्यांच्या सेवानिवृतीनिमित्त विशेषांक प्रकाशित होत आहे हे वाचून आनंद वाटला. श्री अतुल कपोले यांनी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यभार स्विकारल्यानंतर अनेक महत्वाच्या रखडलेल्या प्रकल्पांना चालना देण्याचे काम केले. या महामंडळाच्या अखत्यारीत राज्यातील मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, नवी मुंबईसारख्या वेगाने विकसित होणाऱ्या महानगरपालिकांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी आहे. मुंबईच्या पुढील २५ वर्षाचा पाणी पुरवठ्याचा विचार करुन आतापासूनच प्रकल्पांची आखणी सुरु आहे. यात श्री. अतुल कपोले यांचे योगदान आहे. तांत्रिक अडचणींमुळे या महामंडळाच्या अखत्यारीत असलेले प्रकल्प जसे की दमणगंगा- पिंजाळ प्रकल्प, पोशिर प्रकल्प, शिलार प्रकल्प तसेच महत्वकांक्षी असा कोयना अवजल प्रकल्प असे अनेक प्रकल्प रखडलेले होते. ते श्री. कपोले यांच्या अभ्यासपूर्ण कार्यशैलीमुळे मार्गी लावण्यासाठी मदत झाली आहे.

श्री. अतुल कपोले यांनी आपल्या जलसंपदा विभागातील सेवेदरम्यान गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ आणि शेवटी कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अशा तीन महामंडळामध्ये कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मंत्रालयात उपसचिव, सहसचिव आणि शेवटी कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अशा विविध पदावर उत्कृष्ट सेवा दिली. त्यानिमित्त त्यांना त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य लाभो. त्यांच्या सेवानिवृतीनिमीत्त प्रकाशित होणाऱ्या विशेषांकासाठी शुभेच्छा देतो.

धन्यवाद !

(गिरीष महाजन)

डॉ. संजय बेलसरे
सचिव (लाक्षेवि)

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग

३ रा. मजला, (मुख्य इमारत), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय मुंबई ४०००३२.
ई मेल :- sec.cad@maharashtra.gov.in दुरध्वनी क्र. ०२२ २२०२३१०९.

जा.क्र. सचिव (ला) ०१/२०२६ दि. ७ जानेवारी, २०२६

शुभ संदेश

जलसंपदा विभागातील कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक, इंजि. श्री अतुल कपोले हे आपल्या नियत वयोमानानुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या प्रदीर्घ सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त गौरव समितीने गौरव विशेषांक प्रकाशित करण्याचा घेतलेला निर्णय स्तुत्य आहे. श्री अतुल कपोले यांनी जलसंपदा विभागात सहाय्यक कार्यकारी अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता आणि आता कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून उत्कृष्ट काम केले आहे. त्याचबरोबर कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार त्यांनी सांभाळला आहे. त्यांनी आपल्या सेवा कालावधीत मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभागात विविध प्रकल्प चांगल्या रीतीने मार्गी लावले आहेत. मंत्रालयामध्येखील त्यांनी उपसचिव, सहसचिव म्हणून काम केले आहे. या सर्व भागात रखडलेल्या योजना त्यांनी मार्गी लावल्या आहेत. तर काही पूर्णत्वास नेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या सेवेची दाखल घेऊन त्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने गौरविले आहे.

आपल्या संपूर्ण कारकीर्दीत त्यांनी आपल्या अभियांत्रिकी ज्ञानाचा वापर करून उत्कृष्टपणे प्रकल्पांची मांडणी आणि व्यवस्थापन केले आहे. सेवा काळात कर्तव्य पार पाडत असताना आपले सहकारी अधिकारी, कर्मचारी यांच्याशी अतिशय सौहार्दाचे आणि मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले आहेत. कठीण प्रसंगातून सुकर मार्ग काढणारे आणि कर्तव्यनिष्ठ आणि कार्यकुशल अधिकारी अशी त्यांनी आपली प्रतिमा तयार केली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू सर्वसामान्यांना दिसावेत आणि त्यातून प्रेरणा घ्यावी यासाठी गौरव समितीच्या वतीने जो गौरव विशेषांक प्रकाशित होत आहे, त्याला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

SANJAY M BELSARE

Digitally signed by SANJAY M BELSARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WATER RESOURCES DEPARTMENT, 2.5.4.20=544E07F06FBAB100DC2BFE33DB79FC14350D78D6C16F8FEAB484D842C496717D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B619FF7825128B0AC0C1D94202F9F411ECE90F19D72AB83FAF5A9DDBDFC515DE, cn=SANJAY M BELSARE
Date: 2026.01.08 12:54:48 +05'30'

(डॉ. संजय बेलसरे)
सचिव (लाक्षेवि)

प्रस्तावना

अतुलनीय

एके काळी प्रशासनामध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये एक वाद विवादाचा मुद्दा नेहमी चर्चिला जायचा की शासन सेवेतील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख असावे की नसावे? याबाबत चर्चा करताना म्हटले जायचे की प्रशासकीय अधिकारी सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळला की लोक खुल्या मनाने अडचणी, समस्या मांडतील. त्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना मदत होईल. दुसरीकडे असाही मतप्रवाह होता की प्रशासकीय अधिकारी फार लोकांमध्ये मिसळून वागत असेल तर लोक त्यांच्या खांद्यावर हात टाकतील आणि नको ती कामे सांगतील. अधिकाऱ्याचा धाक रहाणार नाही. परंतु तो वाद आता राहिला नाही. प्रत्येक अधिकारी व्यक्तिसापेक्षपणे परिस्थिती हाताळून यश मिळवित असतो. परंतु काही अधिकारी असे आहेत की ते लोकांमध्ये मिसळून समस्यांचे निराकरण करत असतात. सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबरोबर योग्य तो ताळमेळ राखून काम करण्याची त्यांची पध्दत असते. त्यामुळे ते यशस्वी होतात आणि लोकप्रियदेखील होतात. लोकप्रिय अशा अर्थाने की प्रत्येकाला विश्वास वाटतो की हे साहेब आपले काम नक्की करतील. हा विश्वास जो अधिकारी सर्वसामान्य लोकांमध्ये निर्माण करतो तो अधिकारी लौकीकार्थाने लोकप्रिय ठरतो. असे भाग्य फार थोड्या लोकांच्या वाट्याला येते. त्यामध्ये श्री कपोले सरांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. मी मुख्य अभियंता कोकण प्रदेशचा कार्यभार स्विकारण्यापूर्वी कपोले सरांसोबत एकत्र काम केले नव्हते. मी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या कार्य पध्दतीशी परिचित झालो.

वास्तविक पहाता कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा पसारा खूप मोठा आहे. पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे कोकणातील पाच जिल्हे आणि नाशिक जिल्ह्यातील पश्चिम वाहिनी नद्यांची खोरी इतका मोठा व्याप या कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचा भाग आहे. या महामंडळातील अनेक प्रकल्प वेगवेगळ्या कारणामुळे रखडलेले होते. काही प्रकल्प वर्षानुवर्षे बंद अवस्थेत होते. श्री कपोले सर यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन अतिशय नियोजनबध्द पध्दतीने कामाला सुरुवात केली. बंद पडलेल्या प्रकल्पातील अडचणी समजून घेऊन त्या आधी सोडविल्या आणि प्रकल्प मार्गी लावले.

सरांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्यच असे आहे की ते कामाचा निपटारा अतिशय जलद गतीने करतात. मग त्या कार्यालयीन फाईल्स असतील किंवा ठेकेदारांच्या अडचणी असतील अथवा अधिकारी - कर्मचाऱ्यांचे प्रश्न असतील. समोर आलेले काम तात्काळ हाता वेगळे करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. त्याचबरोबर त्यांचा शांत आणि संयमी स्वभाव सहकाऱ्यांचा आत्मविश्वास वाढविणारा आहे. ज्या ज्या ठिकाणी त्यांनी शासकीय सेवा बजावली, त्या त्या ठिकाणी म्हणजे मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, मंत्रालय आणि कोकण विभागात त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने मैलाचे दगड रोवले आहेत. अनेक कनिष्ठ अधिकाऱ्यांचे ते प्रेरणास्थान आहेत.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळात कपोले सर कार्यकारी संचालक म्हणून रुजू झाल्यानंतर अनेक प्रकल्पांचे काम रखडलेले होते. तसेच प्रकल्पांचे काम सुप्रमा अभावी बंद होते. सरांनी अतिशय पध्दतशीरपणे नियोजन करुन एकेका प्रकल्पाला गती दिली, त्यावर लक्ष केंद्रित केले. मोठ्या प्रमाणावर सुप्रमा प्रस्ताव एसएलटीसी मार्फत शासनाकडे सादर केले. त्याचा सातत्याने पाठपुरावाही केला. त्यामुळे त्यातील बऱ्याचशा प्रकल्पांच्या सुप्रमा मंजूर होऊन प्रकल्प मार्गी लागले. यात प्रामुख्याने प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत एकूण पाच प्रकल्प आहेत. त्यापैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी व अरुणा तर रत्नागिरी जिल्ह्यातील गडनदी आणि अर्जुना या चार प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. या चारही प्रकल्पांची सुप्रमा मंजूर करुन त्याचे योग्य रितीने नियोजन करुन व पाठपुरावा केल्यामुळे हे चारही प्रकल्प पुर्ण झाले आहेत. त्यामुळे २१००० हेक्टर लाभक्षेत्राची निर्मिती व ९३ दलघमी इतका पाणीसाठाही निर्माण झाला आहे. वनजमिन मंजूरी व भूसंपादनाबाबत देखील सरांनी एक मोहिमच उघडून त्यातून अनेक प्रकल्पांना वनखात्याची मंजूरी प्राप्त करुन घेतली आहे. त्यामुळे प्रकल्प पुर्ण करण्यातील मुख्य अडचणी दूर झाल्या आहेत.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत असलेल्या पालघर जिल्ह्यातील देहर्जी या महत्वकांक्षी प्रकल्पाचे काम बऱ्याच वर्षापासून बंद अवस्थेत होते. हा प्रकल्प एमएमआरडीए मार्फत ठेव तत्वावर करण्याचे नियोजित आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी सरांनी विशेष प्रयत्न करुन सुप्रमाला मंजूरी मिळविली. यासाठी अनेकदा एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन या प्रकल्पातील अडचणींचा निपटारा केला. त्यामुळे या चांगल्या प्रकल्पाच्या मार्गातील अडचणी दूर होऊन प्रकल्प मार्गी लागून प्रकल्पाचे ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. यावर्षी म्हणजे जून २०२६ अखेरपर्यंत या प्रकल्पाचे काम पुर्ण होऊन पाणी साठाही होणार आहे. या देहर्जी प्रकल्पाच्या पुर्णत्वानंतर होणारा पाणीसाठा मुंबई लगतच्या वसई विरार महानगरपालिकेला होणार आहे.

मुंबई शहर आणि आसपासच्या उपनगरांची वेगाने होणारी वाढ आणि त्यासाठी लागणारा पाणी पुरवठा याचा विचार करुन पाणी पुरवठ्याचे नियोजन केले जात आहे. एमएमआरडीएच्या क्षेत्रात वाहणारी मुख्य नदी उल्हास असून या क्षेत्रातील बहुतांशी महानगरपालिका जसे ठाणे, कल्याण डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी निजामपूर या महानगरपालिका तसेच अंबरनाथ, बदलापूर या सारख्या विस्तारणाऱ्या नगरपालिका या नदीवर अवलंबून आहेत. एमएमआरडीए क्षेत्रात वेगाने नागरिकीकरण होत असल्याने वाढीव पाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. ज्या प्रमाणात एमएमआरडीए क्षेत्रात लोकसंख्या वाढत चालली आहे व विकास होत आहे त्या प्रमाणात नवीन धरणे गेल्या १० वर्षात बांधली गेली नाहीत. सहाजिकच पाणीटंचाईचे संकट नागरिकीकरणाला भेडसावत आहे. या पाणी टंचाईबाबत शासनाने दखल घेऊन याबाबत नवीन प्रकल्प हाती घेण्याबाबत सुचना दिल्या.

श्री कपोले सरांनी प्रयत्न करुन मुंबई लगतच्या रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात असणारे पोशिर आणि शिलार या प्रकल्पांना चालना दिली. हे प्रकल्प महत्वाचे असले तरी गेल्या अनेक वर्षापासून रखडलेले होते. सरांनी स्वत: लक्ष घालून एमएमआरडीएच्या यंत्रणेसोबत सतत पाठपुरावा करुन दोन्ही प्रकल्प तातडीने सुरु करण्याच्या दृष्टिने पाठपुरावा केला. त्या दोन्ही प्रकल्पांच्या सुप्रमांना शासनाने मान्यता दिल्यामुळे प्रकल्प तात्काळ मार्गी लागले. पुढे प्रश्न निधी उपलब्धतेचा आला. परंतु सरांनी या अडचणीवर

देखील मात करणारा उपाय शोधून काढला. या दोन्ही प्रकल्पातून ज्या महानगरपालिकांना किंवा नगरपालिकांना पाणी पुरविले जाणार आहे, त्या पालिकांनी त्या त्या प्रमाणात प्रकल्प खर्चाचा भार उचलण्याबाबत मंत्रालय पातळीवर अनेक बैठका घेऊन निधीची उपलब्धता करुन दिली. त्यामुळे या दोन्ही प्रकल्पांना गती मिळाली आहे. या दोन्ही प्रकल्पांची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून येत्या चार वर्षाच्या आत म्हणजे सन २०२९ पर्यंत दोन्ही प्रकल्प पुर्ण करण्याचे नियोजन निश्चित करण्यात आले आहे. हे दोन्ही प्रकल्प पुर्ण झाल्यावर मुंबई लगतच्या महानगरपालिका आणि नगरपालिकांना भविष्यात लागणारा पुरेसा वाढीव पाणी पुरवठा होणार आहे.

कोकणात मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होते. त्यामुळे काही ठराविक ठिकाणी दरवर्षी पूरस्थितीला सामोरे जावे लागते. विशेष करुन रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण आणि रायगड जिल्ह्यातील महाडमधील पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. या पुरांचा कायमस्वरुपी बंदोबस्त करावा यासाठी दरवर्षी पूरग्रस्त भागातील लोक आंदोलन करीत असतात. या प्रश्नावर लोक प्रतिनिधी देखील अनेकदा आक्रमक होत असत. या महत्वाच्या विषयाकडेही सरांनी गांभिर्याने लक्ष देऊन या दोन्ही ठिकाणच्या पूरस्थितीचा सखोल अभ्यास करुन कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी सी.डब्ल्यू.पी.आर.एस. या संस्थेची नियुक्ति केली. या विषयाच्या संदर्भात या संस्थेच्या अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठकी घेऊन व चर्चा करुन या संस्थेने अभ्यासपूर्ण अहवाल तयार केला असून तो शासनाला सादर केला आहे. शासनाने या अहवालाला मान्यता दिल्यानंतर टप्प्या टप्प्याने पूर नियंत्रणासाठी उपाय योजना करण्याचे नियोजन आहे. पूरनियंत्रणाचा एक भाग म्हणून चिपळूणच्या वशिष्ठी नदीतून सुमारे १३ लाख मे.टन गाळ काढण्यात आला आहे. त्याचप्रमाणे चिपळूण शहरालगत काही ठिकाणी पूर संरक्षक भिंतीही बांधण्यात आल्या आहेत. त्यामुळे गेल्या दोन वर्षात भरपूर पाऊस पडून देखील पुराची तीव्रता खूप कमी झाली असल्याचे दिसून आले आहे. मोठ्या प्रमाणावर होणारे नुकसान टळले आहे. हे सर्व कपोले सरांच्या प्रयत्नांचे फळ आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही.

मुंबई शहरालगतची उपनगरे झपाट्याने वाढत असून पुढील ३० वर्षात मुंबई शहराला लागणारा पाणी पुरवठा याचा विचार करुन प्रकल्पांची निर्मिती केली जात आहे. त्या नियोजनानुसार राज्याच्या उत्तरेकडील काही पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी वळवून ते वैतरणा खोऱ्यात आणून ते वाढत्या मुंबईला पुरवण्याचे नियोजन आहे. त्यानुसार सरांनी दमणगंगा - पिंजाळ नदीजोड प्रकल्पाचे सुधारित तांत्रिक नियोजन केले आहे. हा प्रकल्पदेखील अतिशय महत्वकांक्षी असून तो पुर्ण झाल्यानंतर मुंबई प्रदेशाला पिण्यासाठी उपयोग होणार आहे.

कोकण प्रदेशातील आणखी एक महत्वाचा प्रकल्प म्हणजे कोयना अवजल प्रकल्प! कोयना जल विद्युत निर्मितीनंतर पश्चिम वाहिनी असलेल्या वशिष्ठी नदीत सुमारे ६७.५० दलघमी इतके अवजल सोडले जाते. या पाण्याचा कोणत्याही प्रकारचा उपयोग न होता ते समुद्राला जाऊन मिळते. या पाण्याचा उपयोग रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी करता येईल का याचा अभ्यास करण्यासाठी श्री.म.दि. पेंडसे यांच्या अभ्यास गटाने सखोल अभ्यास करुन अहवाल तयार केला आणि तो शासनाला सादर केला. परंतु त्या अहवालावर निर्णय झाला नाही. दरम्यान सन २०१८ मध्ये जल परिषद आयोजित करण्यात आली होती. या जल परिषदेमध्ये तात्कालिन मुख्यमंत्र्यांनी कोयना अवजलाचा वापर सिंचन आणि बिगर सिंचन वापरासाठी करण्याच्या सुचना केल्या. एवढेच नव्हे तर शासनाने वॅपकॉस

संस्थेमार्फत अभ्यास करुन डीपीआर सादर करण्यास सांगितले. परंतु याबाबतची पुढील कार्यवाही प्रलंबित होती. दरम्यान नव्याने निर्माण झालेली रायगड जिल्ह्यातील पनवेल महानगरपालिका, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका या महानगरांच्या क्षेत्रात होणाऱ्या गतिमान विकासामुळे नागरिकीकरणाचा वेग अतिशय झपाट्याने वाढला आहे. त्या प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या पाणीसाठ्यात वाढ झालेली नाही. त्यामुळे सहाजिकच पाणी टंचाईला सामोरे जावे लागले. यासाठी जनरेटा वाढल्यामुळे शासनाने वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करण्यासाठी कोयना अवजलाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. या योजनेसाठी श्री कपोले सरांनी पुढाकार घेऊन कोयना अवजलाचे पाणी रायगड - रत्नागिरी जिल्ह्यांना सिंचनासाठी देऊन पुढे नवी मुंबईपर्यंत आणण्याच्या दृष्टिने वॅपकॉस संस्थेबरोबर एम.ओ.यु. करण्यात आला. याच संस्थेच्या सहाय्याने पुर्व प्राथमिक अहवाल देखील तयार करण्यात येत असून तो सन २०२६ च्या अखेरपर्यंत अंतिम स्वरुपात सादर होईल. सद्यस्थितीत कोयना जलविद्युत प्रकल्पातील वीजनिर्मिती झाल्यानंतरचे ६७.५० दलघमी पाणी थेट समुद्रास जाऊन मिळते आणि वाया जाते. त्यापैकी काही प्रमाणात या पाण्याचा उपयोग करण्यात येत असला तरी खूप मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात असून त्याचा उपयोग मुंबई प्रदेश, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी करण्यात येणार आहे.

या सर्व बाबींचा विचार करता असे म्हणता येईल की सरांनी या सर्व रखडलेल्या प्रकल्पांचा साकल्याने विचार करुन त्यांच्या प्रगतीतील अडसर दूर करुन कामांना गती प्राप्त करुन दिली आहे. त्यामुळे हे सर्व प्रकल्प विना अडथळे पूर्ण होतील अशी खात्री आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ति ठरणार नाही.

श्री कपोले सरांचे तत्वच मुळी प्रशासन सतत गतिमान राहिले पाहिजे असे आहे. पाण्याचा प्रवाह वाहत असताना मध्येच अडथळा आला तर पाणी तेथे थांबत नाही, ते पर्यायी वळसा मार्ग काढून पुढे निघून जाते. त्याप्रमाणे जिथे जिथे प्रकल्प वेगवेगळ्या कारणांमुळे बंद पडले आहेत, त्या त्या ठिकाणी सरांनी प्राधान्याने लक्ष घालून त्यातील अडथळ्यावर मार्ग काढून प्रकल्प मार्गी लावले आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकारी संचालक पदाच्या कार्यकाळात अनेक बंद पडलेल्या प्रकल्पांची कामे मार्गी लागल्याचे दिसून येते. आपले सहकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन त्यांनी केलेली किमया निश्चितच सहकाऱ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांचे मार्गदर्शन आणि ज्ञान याचा निश्चितच महामंडळाला फायदा झालेला आहे. येत्या २८ फेब्रुवारी २०२६ रोजी ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत होत आहेत. त्यांची प्रेरणा सतत अधिकाऱ्यांना मार्गदर्शक ठरणार आहे. सरांना त्यांचे सेवानिवृतीनंतरचे आयुष्य सुख समृध्दीचे आणि आरोग्यदायी जावो या सदिच्छेसह......!

इंजि. मिलिंद नाईक
मुख्य अभियंता
जलसंपदा प्रादेशिक विभाग, कोकण, मुंबई

संपादकीय

सामाजिक जाणिव असलेला अभियंता!

वादळ वारा आणि तुफानी पावसात आकाशात घिरट्या घालणारे सारे पक्षी आपल्या घरट्याकडे धाव घेतात आणि आपली सुरक्षा निश्चित करतात. परंतु गरुड हा एकमेव असा पक्षी आहे की जो वातावरणात वारा, पाऊस आणि तुफान सुरु झाले की तो घरट्याकडे न परतता उंच आकाशात अगदी ढगांच्या वर भरारी घेतो आणि आनंदाने विहार करीत असतो. त्याला त्या घोंगावणाऱ्या वादळाची किंचितही भिती वाटत नाही. आपल्या आयुष्यात देखील अशीच काही माणसे असतात ती संकटे किंवा अडचणी आयुष्यात आल्या की ते या संकटांवर मात करुन त्याहून उंच भरारी घेऊन त्यातून लिलया पार होत असतात. अशा व्यक्तिंचे आचार, विचार आणि मार्गदर्शन इतरांसाठी प्रेरणादायी असतात. त्यामुळे अशा व्यक्तिंची चरित्रे प्रकाशित झाली पाहिजेत या ध्यासाने आम्ही या साहित्याच्या वाटेने निघालो आहोत. या वाटेवर अनेक मोठी व्यक्तिमत्वे भेटली. त्यांची व्यक्तिचित्रे बनली. परंतु काही व्यक्तिमत्वे अशी असतात की ते फक्त आपले काम करत रहातात. प्रसिध्दीपासून कोसो दूर असतात. कोणी वंदो अथवा निंदो आपले काम आपण प्रामाणिकपणे करीत रहाणे हा त्यांचा स्वभाव असतो. अशा व्यक्तिमत्वांपैकी एक म्हणजे आमचे मार्गदर्शक मित्र आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री अतुल कपोले साहेब! गेल्या २० वर्षापासून आमची मैत्री आहे. परंतु ते कधीही प्रसिध्दीच्या मागे लागले नाहीत किंवा अमुक एखादी बातमी छापा किंवा लिहा असे कधीही म्हणाले नाहीत. उलट त्यांनी केलेल्या कामाबाबत लिहितानाही ते नम्रपणे म्हणायचे आम्ही वेगळे काही करत नाही. आमचे जे कर्तव्य आहे तेच आम्ही करीत असतो. त्यात प्रसिध्दी देण्यासारखे काय आहे! हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. परंतु आमच्या माहितीप्रमाणे त्यांची जलसंपदा खात्यातील भूमिका नेहमी जिथे कमी तिथे आम्ही अशीच राहिली आहे. अनेक प्रकल्प विविध अडचणींमुळे वर्षानुवर्षे बंद पडलेले होते. तेथे श्री कपोले साहेब यांची बदली झाली की ते चुटकीसरशी सुटायचे आणि कामाला गती प्राप्त व्हायची. मग ते मराठवाडा गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ असो की महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ असो किंवा कोकण पाटबंधारे विकास महामंडळ असो. या सर्व ठिकाणी विविध अडचणींमुळे बंद पडलेले अनेक प्रकल्प कपोलेसाहेबांनी त्या समस्यांच्या मुळाशी जाऊन त्या सोडवून प्रकल्प मार्गी लावले आहेत. याचे अनेकजण साक्षीदार आहेत. जलसंपदा खात्यातील अनेक अधिकाऱ्यांची प्रेरणा असलेले कपोले साहेब सेवानिवृत्त होत आहेत आणि त्यांच्याबद्दल काहीही आम्ही लिहू शकलो नाही तर काळ आम्हाला माफ करणार नाही. त्यामुळे आम्ही त्यांना त्यांच्या निवृतीच्या वेळी एक गौरव ग्रंथ तयार करण्याची परवानगी मागितली. परंतु त्यांनी आपल्या स्वभावाप्रमाणे साफ धुडकावून लावली. बरेच दिवस पाठपुरावा करुनही त्यांनी नकार दिला. त्यांनतर आम्ही त्यांच्या निकटवर्तीय सहकाऱ्यांना गळ घालून साहेबांचा गौरव ग्रंथ प्रकाशित करण्याबात प्रयत्न केला. यात वेळ खूप कमी उरला आणि शेवटी गौरव ग्रंथाऐवजी गौरव विशेषांक प्रकाशित करण्याचे ठरले आणि हा गौरव विशेषांक आपल्या हाती आला आहे.

श्री अतुल कपोले साहेब हे जलसंपदा खात्यातील अनेकांचे मित्र आणि आवडते अधिकारी आहेत. त्यांच्यावर गौरव विशेषांक प्रकाशित होणार आहे म्हटल्यावर अनेकांनी त्यांच्याविषयी लेख लिहिण्याची इच्छा व्यक्त केली. अनेकांनी लगेच

लिहूनही पाठविले. त्यामुळे हा गौरव आपल्या हाती पडला आहे. या अंकात श्री कपोले साहेबांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंतच्या सहकाऱ्यांनी अगदी मनापासून लिहिले आहे. त्यात अगदी वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यापासून ते खात्याच्या सचिवापर्यंत आणि खात्याचे मंत्री आणि मुख्यमंत्र्यांनीही शुभेच्छापर लिहिले आहे. त्यावरुन या व्यक्तिमत्वाची कल्पना येऊ शकेल. श्री कपोले साहेब गुणग्राहक आहेत. चांगल्या गुणवान माणसांचा संग्रह करण्याची त्यांची आवड आहे. आयुष्यात अनेक माणसे त्यांनी जोडली आहेत. त्यामुळे आयुष्यात ते कधी एकटे पडले नाहीत. ते स्वत:च अतिशय विनयशील आणि संयमी असल्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेला माणूस त्यांचा होऊन जातो. आजही त्यानी जिथे जिथे अधिकारी म्हणून काम केले त्या त्या ठिकाणी म्हणजे छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई (मंत्रालय) किंवा कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे येथे त्यांच्यावर प्रेम करणारा वर्ग आहे. हे या गौरव विशेषांकातील त्यांचे लेख वाचून आपल्या लक्षात आल्यावाचून रहाणार नाही.

माणसाच्या अंगात जे गुण असतात ते काही अंशी अनुवंशिकतेने येत असतात तर काही त्याने कौशल्य वापरुन विकसित केलेले असतात. कपोले साहेबांच्याबाबतीत आम्हाला वाटते त्यांनी स्वत: विकसित केलेलेच गुण जास्त आहेत. परिस्थिती पाहून निर्णय घेणे आणि त्याप्रमाणे व्यक्त होणे या गुणांचा प्रत्येकाला अनुभव आलाच असेल. त्यामळेच सर्वांना आपलेसे वाटतात. एकदा आमची ते मंत्रालयात सहसचिव असताना भेट झाली होती. भेटीच्यावेळी ते फारच अस्वस्थ वाटले म्हणून आम्ही सहज विचारले की काही टेंशन आहे का सर ? त्यावेळी त्यांनी काहीच सांगितले नाही परंतु नंतर कळले की सकाळी १० वाजल्यापासून मंत्रालयात बैठकांचा सिलसिला चालू होता. संध्याकाळचे पाच वाजले तरी जेवायला देखील वेळ मिळाला नाही. लगातार बैठका सुरु होत्या. काही दिवसापूर्वीच त्यांची अँजिओप्लास्टी झाली होती. त्यामुळे वेळेवर खाणे पिणे करण्याकडे डॉक्टरांनी लक्ष द्यायला सांगितले होते. परंतु कपोले साहेबांचे स्वत:च्या प्रकृतीपेक्षा कर्तव्य प्रथम असल्याने त्यांनी अक्षरश: काहीही न खाता संपुर्ण दिवस घालविला. तरीदेखील कुठेही चिडचिड नाही की कुठे कर्तव्यात कसूर नाही. असे अनेकदा प्रसंग त्यांच्या आयुष्यात आले आहेत की आधी कर्तव्याला प्राधान्य दिले आणि त्यानंतर इतर गोष्टी. एकदा तर त्यांची आई आजारी होती. जाणे गरजेचे होते. परंतु इकडे अतिशय महत्वाची बैठक मंत्रालयात होती. त्यावेळी त्यांनी आपले जनसेवेचे कर्तव्य श्रेष्ठ समजले. परंतु मातृसेवेचे कर्तव्यही विसरले नाहीत. जळगावमधील एका सहकारी अधिकाऱ्यास फोनवरुन आईच्या तब्येतीबद्दल सांगितल्यानंतर तो अधिकारी स्वत: तिथे जाऊन आईस रुग्णालयात दाखल केले होते. यावरुन आपल्या कर्तव्याच्याबाबतीत ते किती सतर्क असतात ते दिसून येते. त्यांची आणखी एक आठवण या ठिकाणी नमूद करावीशी वाटते ती त्यांच्या माणूसकीची आणि सहृदयीपणाची. त्यावेळी ते जलसंपत्ती भवन पुणे येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. माझा एक पत्रकार मित्र कँसरने पिडित होता. अचानक पुण्याजवळ त्याला त्रास व्हायला लागला. जवळ कोणी ओळखीचे नव्हते. आम्ही त्यावेळी औरंगाबाद येथे रहात होतो. मित्राने आम्हाला फोन करुन परिस्थिती सांगितली. त्यावेळी आम्हाला एकच नाव आठवले ते म्हणजे कपोलेसाहेब! त्यांना फोन वरुन मित्राची परिस्थिती सांगितली. त्यावेळी आतासारखी पेटीएम किंवा गुगल पे सारखी पैसें पाठवायची सोय नव्हती. कसातरी तो मित्र कपोलेसाहेबापर्यंत पोहचला आणि साहेबांनी अतिशय सहृदयीपणे त्याला योग्य ती मदत केली आणि त्याचे प्राण वाचविले. पुन्हा आम्ही प्रत्यक्ष भेटल्यानंतर त्यांचे आभार व्यक्त करु लागलो तर त्यांनी काही घडलेच नाही असे भाव व्यक्त केले. ते काही मोठे काम नाही. माणूस म्हणून जे करायचे ते केले. त्यात काय एवढे मोठे! त्यावरुन

त्यांच्या मोठ्या मनाची कल्पना येते. अशा अनेकांना संकटाच्यावेळी त्यांनी मदतीचा हात दिला आहे. परंतु एका हाताने केलेली मदत ते दुसऱ्या हातालाही कधी कळू देत नाहीत. त्यामुळेच अशा माणसाबद्दल लिहिले गेले पाहिजे असे आम्हाला वारंवार वाटत होते. परंतु शेवटपर्यंत त्यांनी माझी स्तुती करणारे काही लिहू नका असे निक्षून सांगितले होते. परंतु ही स्तुती नाही तर वस्तुस्थिती आहे. याच्यामधून तर मागील लोक प्रेरणा घेत असतात. माणसाचे खरे मोठेपण तर यातच आहे. श्री कपोलेसाहेब केवळ पदाने मोठे नाहीत तर मनानेही मोठे आहेत. तेच त्यांचे खरे मोठेपण आहे.

जलसंपदा खात्यामध्ये सेवा करायची म्हणजे अक्षरश: तारेवरची कसरत असते. लोकप्रतिनिधी जनतेला बांधील असतात. त्यामुळे ते काही धोरणात्मक निर्णय घेतात आणि अधिकाऱ्यांना त्याची अंमलबजावणी करायला सांगतात. मग त्या निर्णयाची अंमलबजावणी करताना ते काम कायद्यात बसवून अशक्य असेल तरीही शक्य करायचे असते. हीच खरी तारेवरची कसरत असते. कधी कायद्याचे उल्लंघन झाले तर लोकप्रतिनिधी जातात निसटून आणि अधिकाऱ्यांना बळी पडावे लागतात. अशी परिस्थिती असताना त्यांनी अतिशय संयमाने स्वत:ला मोहापासून दूर ठेवले आणि निष्कलंक चारित्र्याने शासकीय सेवा केली.

इंजि. कपोले साहेबांच्या अभियंता म्हणून सेवेबद्दल काय बोलावे! एकाद्या सिनेमात कठिण परिस्थितीत अनेक प्रयत्न करुन काम होत नाही. अशावेळी सिनेमाचा नायक तेथे येतो आणि झटक्या सरशी काम पुरे होते. अशीच बाब श्री कपोले साहेब यांच्याबाबतीत घडत गेली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यात असणारा नांदूर मधमेश्वर कालवा १९७६ पासून बंद पडलेल्या अवस्थेत होता. नाशिकचे पाणी त्या कालव्याद्वारे मराठवाड्यात न्यायचे होते. त्या कालव्यात नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या बागायती जमिनी आणि काही घरे जाणार होती. त्यामुळे या दोन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आणि राजकीय पुढाऱ्यांनी या कालव्याला विरोध केला होता. परंतु कपोले साहेबांनी तेथे गेल्यावर त्या सर्वांच्या पोटात शिरुन त्यांची मने जिंकली आणि पश्चिम महाराष्ट्रातील पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्याला मिळवून दिले. कृष्णा खोरे महामंडळातदेखील जनाई सिरसाई सारख्या उपसा सिंचन योजना अनेक वर्षे रखडल्या होत्या. कपोले साहेबांचा हात लागताच त्या मार्गी लागल्या. कोकण पाटबंधारे विकास महामंडळात तर त्यांनी जादूची कांडी फिरवावी अशा योजना मार्गी लावल्यात. अशक्य वाटणाऱ्या योजनांना त्यातील अडथळे दूर करुन गती दिली. त्यामुळेच ते यशस्वी अभियंता ठरले आहेत.

जलसंपदा खात्यातील सिंचन व्यवस्थापन हा त्यांच्या आवडीचा आणि अभ्यासाचा विषय आहे. अतिशय खोलवर ज्ञान संपादन करुन आणि इतरांना सदैव ज्ञान वाटत राहून त्यांनी खात्यातील सिंचन व्यवस्थापन चोख करुन दाखविले आहे. त्रास असूनही प्रामाणिक रहाणे, राग येऊनही शांत रहाणे, अधिकार असूनही नम्र रहाणे या गोष्टी स्वत:च्या आचरणातून दाखवून देऊन त्यांनी आयुष्याचेही व्यवस्थापन उत्तम रितीने त्यांनी केले आहे. हे सर्व त्यांच्या मनाला माहित असले तरी ह्रदयाला कोठून माहित असणार? त्यामुळे त्यांच्या सहनशिलतेने त्यांना अँजिओप्लास्टीपर्यंत नेऊन ठेवले. तरी देखील ते आपला मूळ स्वभाव आणि आपली कर्तव्ये विसरत नाहीत. असे हे महान व्यक्तिमत्व आहे.

जवळपास ३० वर्षाहून अधिक काळ शासकीय सेवा केल्यानंतर आता ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्याबद्दल काही लिहिले नाही तर काळ आम्हाला माफ करणार नाही. त्यामुळे त्यांची मानसिक तयारी नसतानाही आम्हा मित्रांनी आणि सहकाऱ्यांनी हा विशेषांक तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु एवढ्या छोट्या अंकात त्यांचे कार्य मावणारे नाही. तरीदेखील हा एक छोटासा प्रयत्न आहे. विजयकुमार मोरे (संपादक)

मा.कपोले साहेब यांच्या सोबत अविस्मरणीय कार्य अनुभव!

आदरणीय कार्यकारी संचालक कपोले सर यांच्या गौरवशाली कारकिर्दीचा आणि त्यांच्या सेवा निवृत्तीच्या सन्मान प्रसंगी माझा कार्य अनुभव व्यक्त करावासा वाटतो. त्यांच्यासोबत काम करण्याचा आम्हाला लाभलेला बहूमोल अनुभव स्मरणात आणताना देहर्जी मध्यम प्रकल्प हा आमच्या जीवनातील सर्वात संस्मरणीय आणि प्रेरणादायी अध्याय ठरतो. या भव्य प्रकल्पाच्या बांधकाम काळात त्यांनी दिलेले मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रेरणा यांनी प्रकल्पाची यशस्वी वाटचाल सुनिश्चित केली आणि आम्हा सर्वांच्या व्यावसायिक मूल्यांना अधिक दृढ बनवले.

प्रकल्पाच्या संकल्पनेपासून ते अंशतः पाणीसाठ्यापर्यंत मा. कपोले सर हे नेहमीच आमच्या पाठीशी उभे राहिले. "शहाणपण, स्पष्टता आणि स्थिरतेचे प्रतीक म्हणून अशा प्रकारच्या जलसंपदा प्रकल्पांचे बांधकाम हे फक्त तांत्रिक कार्य नसून ती दूरदृष्टी, संयम, शिस्त आणि कठोर परिश्रमांची कसोटी असते. या सर्व टप्प्यांत त्यांची उपस्थिती आम्हाला स्थैर्य, विश्वास आणि योग्य दिशा देणारी ठरली. कठीण परिस्थितीत शांतपणे निर्णय घेणे आणि गुंतागुंतीच्या समस्यांचे स्पष्ट, तांत्रिक व व्यावहारिक उपाय सुचवण्याची त्यांची क्षमता विलक्षण आहे.

माझे वैयक्तिक अनुभव : प्रकल्पाची सुरुवातच त्यांच्या पाठिंब्यामुळे शक्य झाली. देहर्जी मध्यम प्रकल्पाविषयी बोलताना एक गोष्ट मनापासून सांगावीशी वाटते की हा प्रकल्प प्रत्यक्षात सुरू होऊ शकला, त्याची दिशा निश्चित होऊ शकली, ते केवळ मा. कपोले सरांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे आणि अखंड पाठिंब्यामुळेच! प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात अनेक अडचणी, शंका आणि अनिश्चितता डोळ्यासमोर उभ्या रहात होत्या. त्या काळात मनात संकोच आणि संभ्रम होते. पण अशा वेळी मा. कपोले सरांनी दिलेली काही साधी, पण अत्यंत प्रभावी प्रेरक वाक्ये आजही आठवतात. ते म्हणायचे, मोठा प्रकल्प सुरू करण्यासाठी प्रथम त्यावर विश्वास असणे आवश्यक आहे. बाकी सर्व गोष्टी शिस्त आणि समर्पणानं घडतात. त्यांचा हा आत्मविश्वासच आमच्यासाठी प्रेरणादायी ठरला. त्यांचा विश्वास आणि प्रोत्साहन यामुळेच आरंभीचे पाऊल टाकण्याचे धैर्य मिळाले. रेखाचित्रे व नियोजन प्रत्यक्षात एका भव्य, उपयुक्त आणि लोककल्याणकारी प्रकल्पात रूपांतरित होऊ शकले. हा अनुभव माझ्या आयुष्यातील एक अनमोल ठेवा आहे.

मा. कपोले सरांचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे कामातील शिस्त, गुणवत्ता आणि सुरक्षिततेबाबतची त्यांची कडवट निष्ठा. देहर्जी मध्यम प्रकल्पासारख्या संरचनेतील प्रत्येक नकाशा, प्रत्येक तांत्रिक निर्णय आणि प्रत्येक बांधकाम टप्पा हा लाखो लोकांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे, याची त्यांनी आम्हाला सतत जाणीव करून दिली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्यात व्यावसायिक व तांत्रिक जबाबदारी दृढ होऊन प्रत्यक्ष काम करणे हे एक अविस्मरणीय स्वप्न शक्य झाले. सरांच्या तांत्रिक कौशल्याइतकेच महत्त्वाचे होते ते म्हणजे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि मार्गदर्शक म्हणून त्यांचे योगदान. कोणतीही जटिल तांत्रिक गोष्ट समजावून सांगणे, प्रकल्प व्यवस्थापनाचे बारकावे शिकवणे, किंवा स्वतःच्या अनुभवातून मौल्यवान जीवन धडे देणे, मा. कपोले सरांनी ही भूमिका नेहमीच संयमानं आणि आत्मीयतेनं पार पाडली. नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर संयम, सहभावना आणि विनम्रतेने इतरांना पुढे घेऊन जाणे हे त्यांनी आम्हाला शिकवले.

प्रकल्पातील सर्वाधिक आव्हानात्मक टप्प्यांत अनपेक्षित भूवैज्ञानिक परिस्थिती, प्रकल्प बाधितांचा विरोध व आंदोलने किंवा अत्यंत कडक वेळापत्रक त्यांचे शांत आणि ठाम मार्गदर्शन आमच्या टीमसाठी उर्जादायी ठरले. ते स्वतः प्रत्यक्ष कार्य क्षेत्रावर

येऊन प्रत्येक बाबीची तपासणी करत आणि प्रत्येक कर्मचाऱ्याविषयी आदर दाखवत, एक आदर्श काम संस्कृती निर्माण करत. आज ते आपल्या पुढील जीवनप्रवासात प्रवेश करीत असताना, आम्ही त्यांच्या केवळ कामगिरीचाच नव्हे तर त्यांनी निर्माण केलेल्या मूल्यांचा, संस्कारांचा आणि प्रेरणेच्या वारशाचा उत्सव साजरा करतो. देहर्जी मध्यम प्रकल्पाची उभारणी ही त्यांच्या दूरदृष्टीची आणि नेतृत्वाची कायमस्वरूपी साक्ष राहील.

संपूर्ण टीमतर्फे मी त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाचे, अविरत समर्थनाचे आणि आमच्या व्यावसायिक तसेच वैयक्तिक विकासावर केलेल्या परिणामाचे. मा. कपोले सरांसोबत काम करण्याचा अनुभव हा माझ्या आयुष्यातील सदैव जपण्यासारखा ठेवा राहील.

त्यांना पुढील आयुष्यभरासाठी शांततामय, आनंदी आणि समाधानदायी निवृत्तीच्या मनःपूर्वक शुभेच्छा. ते जरी कार्यक्षेत्रापासून दूर जात असले तरी त्यांची शिकवण आणि प्रेरणा आम्हाला सदैव मार्गदर्शन करत राहील जशी त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभारलेली ही धरणसंरचना अभिमानाने उभी आहे.

मा. कपोले सर आपल्या नेतृत्वासाठी, आपल्या ज्ञानासाठी आणि आपल्या कायमस्वरूपी प्रेरणेसाठी!

सेवा निवृतीनंतरचे आयुष्य आपणास व आपल्या कुटुंबियांसाठी अतिशय आनंदाचे, सुखाचे आणि आरोग्यदायी जावो ही ईश्वरचरणी आमची प्रार्थना आहे.

इंजि.दिनेश श्री. शेवाळे
कार्यकारी अभियंता,
पालघर

चतुरस्त्र नेतृत्व करणारा अधिकारी

श्री ए.ए. कपोले साहेब एक बहु आयामी व्यक्तिमत्व आहेत. कुठलेही काम असो ते क्षणार्धात हाता वेगळे करण्याची विलक्षण हातोटी श्री कपोले साहेब यांनी आत्मसात केली आहे. महामंडळाच्या कार्यालयात आलेल्या जनतेचे काम ते क्षणार्धात मार्गी लावून त्या अर्जाचा फोटो आपल्या भ्रमणध्वनीमध्ये काढून संबंधित अधिकाऱ्याला ते त्वरेने पाठवून सूचना देऊन टाकतात. छत्रपती संभाजीनगर मधील एक व्यक्ती अतिशय गरीब! पण कपोले सरांनी त्यास एका परिचयाच्या कंत्राटदाराकडे काम मिळवून दिले. संबंधित व्यक्तीने कपोले सरांबद्दल फारच आत्मियता व्यक्त केली होती.

श्री कपोले साहेबांची कार्यालयात येण्याची वेळ म्हणजे बऱ्याचदा ते कर्मचारी व अधिकारी यांच्या अगोदर उत्साहाने कार्यालयात हजर असतात किंबहुना ते शनिवारी या शासकीय सुट्टीच्या दिवशीही काम करीत बसायचे. त्यांच्याकडे आमच्या कार्यालयाचा म्हणजे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे या कार्यालयाचा अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे ते कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे काम आटपून अतिशय उत्साहाने ते पुणे येथे सतत कार्यरत असल्याचे दिसून येत असत. जलसंपदा खात्याच्या क्रीडा स्पर्धा दरम्यान त्यांनी कर्मचाऱ्यांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. कर्मचारी, कार्यकर्त्यांचे ते आपल्या कुठल्याही कार्यक्रमात अगत्याने कौतुक करीत असत. कामाच्या दरम्यान हसत खेळत काम करण्याचा त्यांचा दृष्टिकोन असे. श्री कपोले सर अगत्याने त्यांच्या बैठकांच्या, दौऱ्यांच्या शेड्यूलमध्ये विवाहांच्या म्हणजे लग्नपत्रिकांच्या तारखांचा समावेश करण्यास सांगत असत. शक्यतो ते विवाहासाठी जाण्याचा प्रयत्न करीत असत.

श्री कपोले सरांचा पहिल्यांदा दूरध्वनीवर परिचय झाला. तेव्हा त्यांना कार्यकारी संचालक पदाचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा अतिरिक्त कारभार मिळाला होता. तेव्हा आमच्या कार्यालयातील श्री अनपट सर यांना त्यांच्या विनंतीवरून फोन जोडून दिला होता. त्या अगोदर मी कडा पुणे या कार्यालयात कार्यरत असताना कपोले सरांनी मला खाली बोलावून महामंडळाचे उपाध्यक्ष हे कार्यालयात येणार असल्याचा निरोप दिला होता. श्री के. बी. कुलकर्णी तेव्हाचे कडाचे अधीक्षक अभियंता यांना निरोप देण्यास सांगितल्याची घटना ही आमची पहिली भेट होती. महामंडळ तसेच इतर कार्यालयातील नेतृत्व करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांचे ते जाहीर कार्यक्रमातून नेहमी कौतुक करीत असत. कार्यकर्त्यांमुळे आपण सुरक्षित काम करू शकतो. हे कार्यकर्ते अनावश्यक व्यक्ती आपल्यापर्यंत पोचू देत नाहीत. त्यामुळेच आपला वेळ वाचतो असे ते म्हणत असत. कपोले सरांनी एकदा सुट्टीच्या दिवशी काही कामाकरिता कार्यालयात बोलावले होते पण त्या दिवशी मला कार्यालयात येण्यास खूपच उशीर झाला. पण पण काही वेळात चेंबरमध्ये बोलावले श्री नाळे साहेब उपअभियंता हे पण त्यावेळेस उपस्थित होते. त्यांच्याजवळ ते बोलताना म्हणाले की पाठकांना काय काम देऊ या अर्थात मला करायचे काम अगोदरच केले गेले होते. पण कपोले सर अजिबात रागावले नाही किंवा त्यांनी नाराजी व्यक्त केली नाही. त्यावेळी मनातून फारच हायसे वाटले. नेतृत्व गुण कपोले सर व त्यांचे सहकारी म्हणजे मुख्य अभियंता यांच्याबरोबर काम करताना त्यांच्यामध्ये मोठा आत्मविश्वास दिसून आला व त्यांच्या प्रति मुख्य अभियंता यांच्या देहबोलीवरून नेहमीच आदरभाव दिसून आला. महामंडळाचे उपाध्यक्ष असो व इतर लोकप्रतिनिधी असो त्यांचे स्वागत कपोले सर अतिशय मनापासून करीत असत. सर्व स्वागताची जय्यत तयारी करीत असत. त्यांच्यासाठी रेड कार्पेट ते आवर्जून टाकीत. फुलांच्या कुंड्या ही ठेवत. एकदा सरांचा बायोडाटा टंकलेखित करताना शालेय जीवनापासून कपोले सर हे गुणवान विद्यार्थी असल्याचे व अव्वल असल्याचे लक्षात आल्याने त्यांच्याबद्दलचा आदरही द्विगुणीत झाला.

श्री वाय.सी. पाठक
स्टेनो, कार्यकारी संचालक
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

मा. कपोलेसाहेब : एक दीपस्तंभ

सबको मिल जाएगी मंजील ये जरुरी तो नहीं ।
जिंदगी राहे सफर है, यूंही चलते रहना ।
तूम चरागों की तरहा, राह में जलते रहना ।
हर अंधेरे को, उजाले में बदलते रहना ।

संगीतकार नौशाद यांच्या तोंडून या ओळी काही महिन्यापूर्वीच ऐकल्या होत्या. अतिशय साध्या शब्दात गुंफलेल्या या ओळींच्या अर्थाने क्षणातच माझ्या मनाने ठाव घेतला. जीवनाची वाटचाल कशी करावी हे अतिशय समर्पक रितीने कवीने चार ओळीत चपखलरित्या मांडले आहे. श्री कपोले साहेबांच्या सेवापूर्तीच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या गौरव विशेषांकाच्या निमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्वाचा वेध घेताना वरील ओळींची मला प्रकर्षाने आठवण झाली. ज्याप्रमाणे एक दीप (चराग) त्यांच्या वाटेत येणाऱ्या प्रत्येक अंधारावर मात करतो, त्याप्रमाणे साहेबांनी आपल्या सेवा कालावधीत येणाऱ्या प्रत्येक अडचणीवर (अंधारावर) त्यांचा अनुभव व ज्ञानरुपी प्रकाश (उजाला) टाकून मात केली आहे. ही सर्व वाटचाल करताना त्यांनी केलेल्या कार्याचा दंभ त्यांच्या मनाला शिवलेला अजिबात जाणवत नाही. त्यांनी त्यांच्या संपुर्ण कारकिर्दीची वाटचाल इतकी सहजपणे केली आहे की वरील ओळीतील यूं ही चलते रहना हे शब्द ते शब्दश: जगले आहेत. असंच म्हणावं लागेल. साहेबांच्या कारकिर्दीमध्ये कित्येक अधिकारी, कर्मचारी व लोकांचे जीवन त्यांच्या अनोख्या कार्यशैलीमुळे उजळून निघाले असेल. त्या सर्वांपैकी मी एक आहे. साहेबांनी प्रकाशमान केलेल्या वाटेवर काही अंतर त्यांच्याबरोबर चालण्याची संधी मला मिळाली त्याबद्दल परमेश्वराचे आभार मानावे तितके थोडेच! त्याबद्दल मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो.

श्री कपोले साहेबांची आणि माझी पहिली भेट पुणे पाटबंधारे मंडळामध्ये झाली. मी त्यावेळी पुणे पाटबंधारे विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होतो. माझ्या विभागाचं कार्यक्षेत्र मुळा-मुठा, मुठा व पवना नद्या वगळता सर्व नद्यांवर होतं. निरा देवघर, भाटघर, भामा-आसखेड, हे मोठे प्रकल्प आणि आंद्र, वडीवळे, नाझरे इ.मध्यम प्रकल्प. तसेच २० ते २५ ल.पा.प्रकल्प आणि १०० ते १२५ के.टी. वियर तसेच १६५ किमीचा निरा डावा कालवा असं विस्तृत कार्यक्षेत्र होतं. प्रामाणिकपणे सांगतो, माझ्या संपुर्ण कारकिर्दीमध्ये सगळं कार्यक्षेत्र फिरणं मलाही जमलं नाही. पण सोबतीला डूबल साहेब, धोडपकर साहेब, रणसींग साहेब, मेमानेसाहेब, हासे साहेब, सावंत साहेब अशी अनुभवी आणि सक्षम फौज

असल्याने ही वाटचाल अतिशय सुकर झाली. या सर्वांवर कडी म्हणजे साहेबांचं आश्वासक आणि खंबीर नेतृत्व! पुणे पाटबंधारे मंडळाच्या कार्यक्षेत्राचं वर्णन करावं तर प्रचंड असंच म्हणावं लागेल. संपुर्ण पुणे जिल्हा, सोलापूर जिल्हा, सातारा जिल्हा अशा अवाढव्य क्षेत्रावर काम करण्याची कसरत साहेबांना करावी लागे. त्यात या सर्व भागातील शेतकरी, व्यवसायिक, आणि लोकप्रतिनिधी यांचा पाण्या विषयीचा गाढा अभ्यास! जवळपास ४-५ खासदार, २०-२५ आमदार, पालकमंत्री, इतर मंत्री, खात्याचे मंत्री आणि पुण्यासारखं जागृत शहर यामुळे सतत जागृत असणे गरजेचे असायचे. परंतु साहेबांचा प्रत्येक प्रश्नाविषयीचा अभ्यास इतका बारकाईने केलेला असायचा की समोरच्या व्यक्तिच्या प्रश्नाचं समाधान होऊन जाई.

निरा डावा कालवा आणि निरा उजव्या कालव्याच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठका म्हणजे त्या काळी वादळी विषय असायचा. प्रत्येक बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधी जादा पाण्याचा आग्रह धरायचे. परंतु पुणे शहराची पाण्याची गरज आणि ग्रामिण क्षेत्राची पाण्याची गरज याचा ताळमेळ साधताना खूप बारकाईने प्रत्येक गोष्ट तपासावी लागे. काही प्रश्नांना तांत्रिकदृष्ट्या उत्तर देणे अवघड असायचे. पण साहेबांचा शांत स्वभाव, अभ्यासपुर्ण वक्तव्य आणि व्यावहारिक चातुर्य यामुळे परिस्थिती सफाईने हाताळली जायची.

पुणे पाटबंधारे विभागात काम करीत असताना त्यांच्याकडून बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. त्यापैकी एक म्हणजे प्रत्येक मिटींगसाठी त्या त्या विषयाचा अभ्यास कसा करायचा? साहेब जर मिटींगला असतील तर इतरांना विषय मांडण्याची फारशी गरज नसायची. मिटींगमध्ये येणारे संभाव्य विषय आणि त्या अनुषंगाने मांडायचा आशय याची तयारी अगोदरच झाल्याने आम्हालाही प्रत्यक्ष मिटींगमध्ये कमी ताण असायचा.

मा. कपोलेसाहेब कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असतानाही त्यांच्या प्रचंड व्यापातून यासाठी खास वेळ काढून विषयाची पूर्ण माहिती घ्यायचे. मला याचा प्रत्यक्ष अनुभव माझ्याकडे लघू पाटबंधारे विभाग ओरस जि. सिंधुदुर्ग येथील नरडवे प्रकल्पाच्या मा. अप्पर मुख्य सचिव श्री दिपक कपूर साहेब यांच्या बैठकीच्या निमित्ताने आला. पुण्यामध्ये एक पुर्ण सुटीचा दिवस घेऊन साहेबांनी प्रकल्पाचे बारकावे तपासून त्याची पुर्ण माहिती घेतली. प्रकल्पाच्या कामाची सद्यस्थिती, पुनर्वसन सद्यस्थिती, प्रकल्पांतर्गत कोर्ट केसमध्ये झालेले निर्णय, त्या अनुषंगाने आपण केलेली कार्यवाही , प्रकल्पाच्या वाटचालीतल्या महत्वाच्या तारखा, अपेक्षित निर्णय घेतला तर त्याचे आर्थिक परिणाम काय होतील इ. सर्व प्रकारची माहिती घेऊन एक सविस्तर प्रकल्प टिप्पणी आमच्याकडून बनवून घेतली. त्यामुळे मंत्रालयातील बैठकीत कुणाला बोलण्याची वेळही आली नाही. प्रत्यक्ष कार्यकारी संचालक म्हणून साहेब स्वतःच विषयाची सखोल माहिती देत असल्याने आम्हालाही मिटींगसाठी निश्चिंतपणे उभे रहाता आले आणि बैठक निर्वेधपणे पार पडली.

साहेबांचा दुसरा महत्वाचा गुण म्हणजे त्यांचा शांत व स्थिर स्वभाव. परिस्थिती कशीही असो ते स्वतःची स्थिरता (बॅलन्स) व संयम कधीही ढळू देत नसत. त्यामुळे कठीण परिस्थितीत निर्णय घेताना त्याचा खूप उपयोग होत असे. आयुष्यात काही प्रश्नांना काळ हेच उत्तर असते. त्यामुळे काही वेळा निर्णय न घेणे हाच निर्णय घ्यावा लागायचा. त्यावेळी जाऊ दे, असू दे, बघूया हे साहेबांचे जाणिवपूर्वक बोललेले आश्वासक शब्द पाठिशी असायचे. त्या गोष्टीचा प्रत्यय नंतर यायचा.

साहेबांचा तिसरा महत्वाचा गुण म्हणजे शांतपणे आणि पुर्णपणे समोरच्याचे म्हणणे ऐकून घेणे. त्या दृष्टीने ही इज अ गुड लिसनर! त्यामुळे त्यांना समोरील व्यक्तीच्या प्रश्नातील बारकावे लक्षात येत असत. त्यामुळे त्यांना प्रश्नांची उकल लवकर करता येत असे. शासकीय कामकाजामध्ये कित्येकदा प्रश्न सोडवणे शक्य होत नाही. परंतु समोरच्याचे म्हणणे शंभर टक्के ऐकल्याने प्रश्न कर्त्याचे ५०% समाधान होते आणि त्याची तीव्रता ही कमी होते. कित्येकदा प्रश्न सुटला नाही तरी समोरचा मनुष्य त्याचे पूर्ण ऐकून घेतल्याने समाधानी होतो. त्याचाही प्रत्यय मला माझ्या कामकाजात प्रत्यक्ष आला. मी तिलारी प्रकल्पाच्या घोटगेवाडी गावात सरपंचाच्या विनंतीवरून कालव्यावर गेलो होतो. त्यांचे प्रश्न ऐकून

घेतल्यानंतर त्यांनी मला प्रत्यक्ष बोलून सांगितले की साहेब आमचे प्रश्न कधी सुटतील माहित नाही पण तुम्ही ऐकून घेतलं, साईट विजिट केली हेच आमच्यासाठी खूप आहे. अर्थात माझं वागणं, प्रश्न संयम ठेवून ऐकलं आणि तो सोडवण्यासाठी प्रयत्न करणं हा माननीय कपोले सरांचा गुण आयुष्यात ठिकठिकाणी कामी येतो. अर्थात वैयक्तिक नाते संबंधातही हा गुण महत्त्वाचा ठरतो.

श्री कपोले साहेबांचा चौथा महत्त्वाचा गुण म्हणजे हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांच्यावर त्यांच्या कार्यक्षमतेनुसार विश्वास ठेवणे आणि तुम्ही आणा मी करून देतो हे आश्वासक शब्द! त्यामुळे कामासाठी धावपळ करण्यास हुरुप येतो. उदाहरण द्यायचं झालं तर त्यांच्या कार्यकाळात पुणे पाटबंधारे मंडळ येथे वडिवळे धरणाची गळती काही प्रमाण कमी करण्यासाठी त्यांनी मला प्रोत्साहन दिले. तरी माणसं इन्स्पेक्शन नंतर त्यावेळचे शाखा अभियंता श्री जाधव यांनी धरणाचा एनओएफ सेक्शन इंटॅक्ट वेल ऑफ सेक्शन आणि धरणाजवळच कालव्याच्या तळातून आखलेली गळती काढण्यासाठी केमिकल मिश्रित प्लास्टर हा उपाय सुचवला. मलाही तो पटला. एक चांगले कंत्राटदार मला आता नाव आठवत नाही हे काम करायला तयार झाले.

त्याकाळी व्यवस्थापन विभागाचे बजेट कमी असायचे. मध्यम प्रकल्पासाठी तर खूपच कमी तरतूद होती. परंतु साहेबांनी माझ्यावर विश्वास टाकला आणि अतिशय कमी खर्चामध्ये ओव्हर फ्लो सेक्शन वगळता इतर बरेचसे काम यशस्वीरित्या पूर्ण केले व इतर बाबी टाळणे शक्य झाले. याच कालावधीत पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने कांबळेश्वर बंधारा पिलर काही मंडळींनी स्फोट करून नुकसान केले होते. त्यामुळे बंधाऱ्यातील पाणीसाठा खालच्या बंधाऱ्यांमध्ये वाहून जाऊ लागला परंतु साहेबांच्या मार्गदर्शनाखाली तात्कालीन उपअभियंता श्री योगेश सावंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सर्व यंत्रणा कामाला लावून तात्काळ वाहून जाणारे पाणी अडवले आणि पिलरचे झालेले नुकसानही यथावकाश भरून काढले. या कामाबद्दल साहेबांनी आम्हाला प्रशस्तीपत्रकेही दिली.

आणखी एक आठवण आठवते. सन २०१५ साली पाऊस कमी झाला आणि भाटघर, नीरा देवघर सिस्टीममध्ये फक्त ७० टक्केच पाणीसाठा झाला. या पाण्याचे वाटप निरा डावा कालवा आणि निरा उजवा कालवा यामध्ये व्यवस्थित करणे आवश्यक होते. त्याप्रमाणे दोन्ही विभागांनी या पाण्याच्या वाटपाची आकडेमोड केली होती, जेव्हा धरणे शंभर टक्के भरलेली असतात तेव्हा पाणी वाटपात कोणतीही अडचण येत नाही, पण पाणी कमी असताना आकडेमोड करताना कोणत्या विभागाची आकडेमोड मान्य करायची हा प्रश्न अधीक्षक अभियंता यांच्यासमोर असतो. पाण्याबाबतचे हे शीत युद्ध त्या विभागात त्या विभागातील अभियंत्यांना माहीत असते. त्यामुळे साहेबांसमोर दोन्ही विभागाच्या आकडेमोडीवर सविस्तर चर्चा झाली. निरा उजवा कालव्याच्या तात्कालीन अभियंत्यांना ती आकडेमोड मान्य नाही असे दिसत होते. तथापि जेव्हा माझ्या विभागाची आकडेमोड साहेबांना समजावून सांगितली तेव्हा ती साहेबांनी मान्य केली आणि त्याप्रमाणे सिंचन कार्यक्रम आखण्यात आला. हीच आकडेवारी कालवा सल्लागार समितीत देखील मान्य झाली. मला आठवते सन २०१५ साली नीरा डावा कालव्याच्या सिंचन योजनांमुळे उन्हाळ्याचेही आवर्तन पाणी कमी असून देता आले आणि त्या भागातील शेतकऱ्यांना याचा फायदा झाला. साखर कारखान्यांनाही ऊस पिकाने तग धरल्याने गळीत हंगामासाठी याचा उपयोग झाला. त्यामुळे खूप मोठी आर्थिक उलाढाल ठप्प होण्यापासून वाचवता आली. अर्थात त्या सर्वांचे श्रेय त्या वेळचे माझे विभागातील कर्मचारी श्री कटके तसेच त्या वेळेचे सर्व उपअभियंता यांना आहे. साहेबांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासामुळेच हे शक्य झाले.

श्री कपोले साहेबांचा पाचवा महत्त्वाचा गुण म्हणजे पुढे होऊन नेतृत्व करणे! अर्थात इंग्रजीत लीडिंग फ्रॉम फ्रंट. बऱ्याचदा विभागाचा कोणताही कार्यक्रम असो की कोणतीही महत्वाची बैठक असो, बऱ्याचदा वरिष्ठांचा अभ्यास नसेल तर कनिष्ठ अधिकाऱ्याला पुढे केले जाते. त्याची परिणती अशी होते की वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर बोलताना कनिष्ठ अधिकारी तणावाखाली गडबडून जातो आणि बैठकीत व्यवस्थित निर्णय प्रक्रिया होत नाही.

याउलट साहेब स्वतः सर्व गोष्टी बारकाईने पाहून स्वतःच विषयाची मांडणी करत असल्याने बैठक सुरळीत पार पडून निर्णय प्रक्रिया योग्य दिशेने जाण्यास त्याची मदत होत असे. प्रत्येक बैठकीत त्यांचे सादरीकरण अतिशय सौम्य भाषेत, शांतपणे व मुद्देसूदपणे मांडलेले असायचे आणि त्यांची तीच पद्धत काही अंशी अंगीकारण्याचा मी प्रयत्न करतो आहे.

श्री कपोले साहेबांचा पुढचा महत्त्वाचा सहावा गुण म्हणजे त्यांचे विभागातील वरिष्ठांशी असलेले आपुलकीचे जिव्हाळ्याचे संबंध! एकूणच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गोडव्यामुळे आणि अभ्यासपूर्ण विवेचनामुळे सर्वांना ते आपलेसे वाटतात. पुणे पाटबंधारे विभागात याचा आम्ही बऱ्याचदा गैर फायदा घेतला. साइटवर एखाद्या प्रश्नावर लोक आक्रमक झाले तर आम्ही त्यांना कपोले साहेबांकडे बैठक घेऊ असे आश्वासन देत असू. त्यावर समोरच्या माणसांनाही साहेबांकडे बैठक होऊन आपला प्रश्न मार्गी लागेल हा विश्वास असल्याने त्या प्रश्नाची तात्कालीक तीव्रता लगेच कमी व्हायची. दरम्यान बैठक झाली नाही तरी तो प्रश्न काहीतरी होऊन निकाली निघायचा. अगदी अलिकडे म्हणजेच ७ नोव्हेंबर २०२५ रोजी तिलारी प्रकल्पावर माननीय अप्पर मुख्य सचिव श्री दीपक कपूर साहेब यांची भेट झाली. त्यावेळी साहेबांचे आणि त्यांचे संबंध किती आपुलकीचे आहेत हे जवळून पाण्याचा योग आला. मुख्य सचिव साहेबांची भेट म्हणजे संपूर्ण प्रकल्पाच्या अभियंत्यांच्या मनामध्ये अत्यंत भीतीचे

वातावरण होते. मला तर रात्री अप रात्री जाग यायची. तयारीमध्ये काहीही त्रुटी राहू नये यासाठी सगळेच दक्ष होते. परंतु ऐन वेळी काहीतरी होईल आणि मा.कपूर साहेबांच्या रोषाला सर्वांना सामोरे जावे लागेल अशी भीती वाटत होती. परंतु सर्व दौरा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडला. माननीय कपूर साहेबांनी सर्वांचे कौतुक केले. संपूर्ण दौरा कार्यक्रमात माननीय कपूर साहेब आणि कपोले साहेबांची केमिस्ट्री सर्वांनी जवळून पाहिली. त्यांच्या या आपुलकीच्या संबंधामुळेच संपूर्ण दौऱ्यामध्ये खूप खेळीमेळीचे वातावरण राहिले. प्रत्येक दौऱ्यात तयारीमध्ये काही त्रुटी राहतातच. पण या दोघांच्या नात्यातील जवळकीमुळे त्या त्रूटी मा.कपूर साहेबांनी दृष्टीआड केल्या असतील असे मला वाटते.

दौरा संपल्यानंतर माननीय कपोले साहेबांना ही गोष्ट मी प्रांजळपणे सांगून टाकली. बरेचदा वरिष्ठांचे संबंधांमध्ये काही गैरसमज असतील तर दौऱ्यामध्ये कितीही तयारी केली तरी काही ना काही त्रुटी निघून त्याचा राग सर्वांवर निघतो. याचा प्रत्यय विभागात अनेकाने घेतला असेल. पण आमच्या दौऱ्यात माननीय कपोले साहेब सोबत असल्याने व्यक्तिशः मी तरी काही अंशी निश्चित होतो. दौरा संपल्यावर साहेबांनी व्यक्तिशः सर्वांची स्तुती केली. त्याप्रमाणे तसा निरोप सर्वांना दिला आणि आपल्या गुणग्राहकतेचा प्रत्यय सर्वांना दिला. चांगले काम करणाराची स्तुति करणे आणि खराब काम करणाऱ्यांना सौम्य शब्दात चोप देणे हा साहेबांचा आणखी एक विशेष गुण! श्री कपोले साहेबांनी त्यांच्या सेवा कालावधीत असंख्य प्रकल्पांची कामे मार्गी लावली असतील. त्यामुळे त्यांच्या तांत्रिक ज्ञानाबद्दल मी बोलणे म्हणजे दिव्याने सूर्याबद्दल बोलण्यासारखे आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या या तांत्रिक बाबीबद्दल माहीत करून घ्यायचे असेल तर त्यांनी उभे केलेले प्रकल्प पाहणे उचित होईल. ते शब्दात मांडणे शक्य नाही.

शासकीय सेवा करणे ही गोष्ट पूर्वीसारखी सोपी राहिलेली नाही. माहिती तंत्रज्ञान, सोशल मीडियाच्या या युगात तुमची प्रत्येक गोष्ट स्कॅन केली जात आहे. तुमचा प्रत्येक निर्णय काटेकोरपणे तपासला जात आहे. अशा वेळी साहेबांनी त्यांच्या भक्कम तांत्रिक बाजू आणि वैयक्तिक प्रशासकीय गुणांच्या आधारे या निसरड्या वाटेवरचा प्रवास लिलया पार पाडला आहे. हा दीर्घ प्रवास निवृत्तीच्या उंबरठ्यावर संपणार आहे. परंतु असे सक्षम व्यक्तिमत्व सेवानिवृत्त होणे ही बाब खचितच शासनासाठी नुकसानदायक आहे असे मला वाटते. सेवानिवृत्ती नंतरही साहेबांनी खात्यामध्ये कार्यरत राहावे जेणेकरून त्यांचा सहवास काही काळ मला लाभेल असे मला वाटते. साहेबांना सेवानिवृत्तीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!

जाता जाता एक आठवले. साहेबांना मध्यंतरीच्या काळात हृदयविकाराचा त्रास झाला. त्यावेळी पुणे पाटबंधारे विभागातून माझी बदली झाली होती. इतक्या शांत, संयमी व्यक्तिमत्त्वास हा त्रास होईल असे मलाही वाटले नव्हते. परंतु घडले ते शंभर टक्के खरे होते. वैयक्तिक आयुष्यातले चढ-उतार आणि शासकीय कामकाजातील ताण तणाव ही बाब प्रत्येकाच्या वाट्याला येतेच. परंतु परिस्थिती संयमाने हाताळताना डोके शांत ठेवणे ही गोष्ट मेंदूला मान्य असली तरी हृदयाला ते मान्य असेलच असे नाही. यातून पुढे हृदयविकारासारख्या आपत्तीला साहेबांना तोंड द्यावे लागले असावे. अर्थातच यासाठी इतरही बरीच कारणे असतात. परंतु हे मात्र खरे की साहेबांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये त्यांच्याशी संबंध आलेल्या शेकडो कर्मचारी आणि शेतकऱ्यांच्या हृदयाची काळजी त्यांचे प्रश्न वेळीच सोडवून घेतली आहे. साहेबांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी कळकळीची प्रार्थना! वादळ वाऱ्यात देखील अथांग समुद्रातील जहाजांना दिशा देणाऱ्या दीपस्तंभाचीच उपमा साहेबांना लागू आहे हे निश्चित! शब्द प्रपंच करेल तितका थोडाच आहे. साहेबांचे व्यक्तिमत्व ही सर्व समावेशक अथांग सागरासारखे आहे. साहेबांच्या आसपासचं वातावरण त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे हलकंफुलकं आणि कवीच्या भाषेत सांगायचं तर सुगंधित होऊन जाते. त्यांच्या निवृत्तीनंतरही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि आठवणींचा सुगंध आमच्या आयुष्यात दरवळत राहील यात शंकाच नाही. त्यांना पुढील वाटचालीसाठी आणि आरोग्यदायी अनेक अनेक शुभेच्छा!

इंजि. विनायक जाधव
(कार्यकारी अभियंता)
सिंधुदुर्ग पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग
चराठे, सावंतवाडी

आदरयुक्त दरारा असणारे व्यक्तिमत्व : मा.कपोलेसाहेब

माझी व कपोले साहेबांची प्रथम भेट ही विधान परिषदेच्या माजी सभापती महोदया डॉक्टर नीलम ताई गोरे यांनी वार्षिक लेखे प्रलंबित असलेल्या महामंडळांची बैठक आयोजित केलेली होती त्या बैठकीच्या वेळी झाली. त्यावेळेस त्यांचा बिलकूल अहंकार नसलेला स्वभाव याची मला ओळख झाली. कपोले सरांनी कार्यकारी संचालक महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ या पदाचा पदभार घेतल्यानंतर त्यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव आला. त्यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली. यावेळेस त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही आय. पी. एल. ए. म्हणजेच आभासी स्वीय प्रपंजी लेखा प्रणाली राबविण्यात यशस्वी झालो. यापूर्वी आम्ही महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला शासनाकडून जे अनुदान मिळायचे ते सर्व आहरीत करून बँक खात्यावर ठेवले जायचे. अशा प्रकारे जवळपास ४००० कोटी रुपये निधी आहरित करून बँक खात्यावर ठेवले जायचे. त्यामुळे सदर निधी विना वापर पडून राहायचा व याचा फायदा बँकेस व्हायचा. सदर प्रणालीमुळे प्रत्यक्ष खर्च हा शासनाच्या खात्यावरून होत असल्याने विना वापर निधी अडकून राहत नाही. तसेच कंत्राटदाराचे नावे चेक काढणे किंवा बँकेमार्फत आरटीजीएस करणे यासारख्या पद्धती बंद होऊन ऑनलाईन या सिस्टीमद्वारे लाभार्थी यांचे खात्यावर जमा होत असल्याने याबाबत पारदर्शकता आली. तसेच यानंतर ही प्रणाली सर्व महामंडळात राबविण्यात आली.त्यामुळे जलसंपदा विभागाचे जवळपास २५ हजार कोटी रुपये जे काढून बँकेत ठेवले जायचे ते बंद झाले. तसेच यानंतर शासनाने व्ही. पी. डी. ए. ही सिस्टम इतर विभागासाठी करण्यात आली. त्यामुळे जवळपास ४० हजार कोटी पेक्षा जास्त रक्कम शासन खात्यावरून काढून ठेवण्यात येत होती ते बंद झाले. त्यामुळे शासनाचा मोठा फायदा झाला आहे. सदर प्रणाली राबविण्यामध्ये कपोले साहेबांची मोलाची मदत झाली. श्री कपोले सरांनी पदभार घेतल्यानंतर शासनाने उपसा सिंचन योजनांच्या वीज देयक सवलतीचा दर बंद केला व यावेळेस बिगर सिंचन प्रापन सूची खूप मोठ्या प्रमाणात मंजूर झाले होते. त्यानुसार निविदा निघाल्या होत्या. मोठ्या प्रमाणावर बिगर सिंचन देयके महामंडळात सादर झालेली होती. यावेळी सरांनी देयके देण्याबाबत योग्य कार्यपद्धती आखून दिली. त्याप्रमाणे स्थानिकांचा व कंत्राटदारांचा रोष पत्करून नवीन प्रापन सूची मंजूर केली नाही व माननीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार साहेब यांचे निर्देशनास ही बाब

व्यवस्थितरित्या आणून याबाबत महाराष्ट्र शासनाच्या अर्थसंकल्पांमध्ये तरतूद करणे व उपसा सिंचन योजनेच्या सवलतीच्या वीज दराचा शासन निर्णय निर्गमित केला. त्यामुळे महामंडळाची पत वाचली व कंत्राटदाराचा होणारा संभाव्य त्रास देखील वाचला. महामंडळाच्या कार्यालयामध्ये दैनंदिन काम करताना राजकीय दबाब व इतर दबावामुळे नस्तीवर नियमबाह्य शेरा मारण्याबाबत कधीही सूचना आल्या नाहीत. तसेच कामकाज नियमानुसार कसे होईल याबाबतीत नेहमीच त्यांनी दक्षता घेतली. कपोले सरांकडे दोन महामंडळांचा पदभार होता. तसेच शासनामार्फत इतरही बरीच कामे त्यांच्याकडे सोपविण्यात येत होती, अशा वेळेस कुठलेही देयक साहेब ऑफिसमध्ये नाहीत किंवा मुंबईला आहेत या कारणास्तव प्रलंबित ठेवली

नाहीत तसेच ठेकेदाराने भेटावे, फोन करावा अशी कुठलीही अपेक्षा न ठेवता बहुतांशी देखील त्याच दिवशी ऑनलाइन मंजूर करण्यात आली. त्यामुळे सरांचा कालावधी हा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या इतिहासात सुवर्णकाळ होता असे म्हणल्यास वावगे ठरणार नाही. सरांना भेटायला येणारे अभ्यंगत, हाताखालील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबत सरांची वागणूक अतिशय आत्मीतेची व माणुसकीची होती. रागावणे, चिडणे किंवा चूक झाली तर अपमानास्पद वागणूक देणे असे प्रकार कधीही केले नाहीत. तथापि सरांचा एक आदरयुक्त दरारा होता. यामुळे कोणतीही कामे प्रलंबित राहत नव्हती. भूसंपादनाबाबतचा निधी तसेच छोटे कंत्राटदार यांचेवर अन्याय न होता त्यांची मागणी प्रलंबित राहणार नाही याची नेहमी दक्षता साहेब घेत होते. या कामासाठी सरांनी कायम प्राधान्य देऊन सर्जनशील व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय आणून दिला. श्री कपोले सरांनी क्षेत्रीय स्तरावर केलेल्या प्रभावी कामगिरीचा परिचय त्यांना भेटायला येणारे लाभार्थी, शेतकरी, वकील, सनदी लेखापाल यांच्याकडून ऐकलेल्या गौरव उद्गारातून सरांबाबतचा आदर बघायला मिळतो. कोणतेही काम असेल तर ते थेट सरांना मी निसंकोच दूरध्वनी करू शकत होतो. विशेष बाब म्हणजे सर २४ बाय ७ तास दूरध्वनीवर उपलब्ध असायचे. यामधून एखादा अधिकारी किती कर्तव्यनिष्ठ व जबाबदारीचे पदावर असून सुद्धा कोणताही अहंकार न बाळगता कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी इतर अभ्यंगत यांच्यासाठी सहजपणे उपलब्ध होणारा व प्रश्न समजून त्यांची निराकारपणे सोडवणूक करणारा आहे हे दिसून येते. सरांची सेवापूर्ती होत असताना सरांनी जलसंपदा विभागासाठी दिलेले योगदान कायम विभागाच्या व आमच्या स्मरणात राहील. आदरणीय सरांना सेवापूर्तीच्या खूप खूप शुभेच्छा व पुढील आयुष्य आरोग्यदायी आनंदी जावो ही सदिच्छा व्यक्त करतो!

श्री संजय अनपट
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे

सर्व गुण संपन्न अभियंता : इंजि. अतुल कपोले साहेब

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणेचे कार्यकारी संचालक श्री अतुल कपोले साहेब यांच्या सेवापुर्ती निमित्त प्रकाशित होणाऱ्या गौरव विशेषांकात माझे मनोगत खालील प्रमाणे सादर करीत आहे. माननीय श्री अतुल कपोले साहेबांची आणि माझी भेट सर्वप्रथम श्री कपोले साहेब हे कोयना डिझाईन सर्कल कोथरुड पुणे अंतर्गत कोयना संकल्पचित्र विभाग क्रमांक ३ कोथरूड, पुणे येथे कार्यकारी अभियंता या पदावर सन २००८ मध्ये हजर झाले होते त्यावेळी झाली. त्यावेळी श्री कपोले साहेब यांनी कुंभी प्रकल्प, काळ प्रकल्प, कोणाल प्रकल्प व विशेष करून कोयना जलविद्युत प्रकल्प टप्पा चार ब चे संकल्पने व संकल्पचित्रे पूर्ण केली. उदाहरणार्थ इमर्जन्सी गेट, सर्विस गेट, ट्रॅश रॅक गेट यांची संकल्पने व संकल्प चित्रे पूर्ण केली. ही सर्व संकल्पचित्रे ऑटोकॅड वर पूर्ण करण्यात आली होती. तसेच श्री कपोले साहेब यांनी कार्यकारी अभियंता या पदावर असताना कोयना धरण पायथा जलविद्युत प्रकल्पातील (२ X ४०) मेगावॅटचा ट्रान्जीएन्ट ॲनालॅसिसचा अभ्यास अहवाल तयार करून त्याचे सादरीकरण सीकेडी, झेक रिपब्लिक या देशांमध्ये केले. हे काम श्री कपोले साहेब यांचे कौतुकास्पद आहे. या कामांमध्ये श्री कपोले साहेब यांनी या विषयाचा सखोल अभ्यास केला होता. त्यामध्ये श्री अतुल कपोले साहेबांची खूप मेहनती होती. तसेच श्री अतुल कपोले साहेब यांनी आयएसओ ९००१ - २००० प्रणालीचे काम देखील उत्कृष्टरित्या पूर्ण केले. तसेच श्री अतुल कपोले साहेब यांनी डिझाईन ऑफ बरीड पेनस्टॉक चे देखील संकल्पन व संकल्पचित्रे उत्कृष्टरित्या पूर्ण केली. तसेच श्री अतुल कपोले साहेब यांनी कोयना जलविद्युत प्रकल्प स्तर ४ येथील जुन्या व नवीन आधिजल भुयाराची जोडाची कामे देखील उत्कृष्टरित्या पूर्ण केली. ॲडिशन सर्ज गॅलरी येथे स्टील लायनर ऐवजी एस. एफ. आर. एस. करण्याचे काम देखील त्यांनी उत्कृष्टरित्या पूर्ण केले. तसेच त्यांनी पेंच आरबीसी जलविद्युत प्रकल्पाचे संकल्पना व संकल्पचित्रे ची कामे उत्कृष्टरित्या पूर्ण केली. तसेच श्री कपोले साहेब यांनी पेंच आरबीसीचे काम उत्कृष्टरित्या पूर्ण केले. वरील सर्व कामे ही कपोले साहेब यांनी संकल्पने ही स्टॅडप्रो वर तसेच संकल्पचित्रे ऑटोकॅडचा वापर करून वेळेत आणि उत्कृष्टरित्या

पूर्ण केली. ही खूप कौतुकास्पद बाब आहे. तसेच कपोले साहेबांनी शासनाच्या वतीने होणाऱ्या सरळ सेवा भरतीमध्ये सरळ सेवा भरती २००८ परीक्षेची कामे सुद्धा उत्कृष्टरित्या पूर्ण केलेली आहेत. ही सुद्धा कौतुकास्पद बाब आहे. या कामातही मी श्री कपोले साहेबांसोबत होतो.

कार्यकारी अभियंता श्री अतुल कपोले साहेब केडीसीमध्ये होते त्यावेळी मी साहेबांसोबत होतो. श्री कपोले साहेब खूप प्रेमळ व शांत स्वभावाचे आहेत.साहेबांची काम करून घेण्याची पद्धत फार उत्कृष्ट आहे. योग्य वेळेत कामे कशी पूर्ण होतील हे त्यांच्याकडून मला खूप शिकायला मिळाले. शासनाला आपल्याकडून कामाचा मॅक्झिमम आउटपुट कसा द्यावा हे सुद्धा त्यांच्याकडून खूप शिकण्यासारखे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे श्री कपोले साहेब आपल्याला दिलेल्या कामात स्वतः पूर्णपणे समरस असायचे व उत्तमरीत्या मार्गदर्शन करायचे. श्री कपोले साहेब काम करून घेताना कधीही कोणावरही रागवत नव्हते. ते अगदी व्यवस्थित समजावून सांगून आपल्याला दिलेले काम वेळेत कसे पूर्ण करायचे हे योग्य रित्या सांगायचे. त्यामुळे श्री कपोले साहेब यांच्याबरोबर काम करताना आपोआपच उत्साह यायचा आणि एक प्रकारचे समाधान देखील मिळायचे. तसेच अतुल कपोले साहेब यांनी शासनाच्या इतर ऍक्टिव्हिटी मध्ये उत्कृष्ट रित्या कामे केलेली आहेत. उदाहरणार्थ जलसप्ताह दिन, संविधान दिन, विविध स्पोर्ट्स, संगीत इत्यादी क्षेत्रांमध्ये देखील त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतलेला होता.

श्री कपोले साहेब माझे गुरु आहेत आणि मी स्वतःला भाग्यवान समजतो कारण की मला श्री कपोले साहेबांसोबत शासकीय सेवेत बारा वर्षे काम करण्याची संधी मिळाली. जलसंपदा विभागातील प्रदीर्घ सेवेनंतर ते आता सेवानिवृत्त होत आहेत. या पुढील आपल्या आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुमच्या आयुष्यात आनंद यावा, या पुढचा प्रवास हसरा आणि आनंद

देणारा असावा अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो. श्री अतुल कपोले साहेब तुम्हाला सेवा निवृत्तीनिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! गॉड ब्लेस यु!

इंजि. अजित शामराव शिंदे
सेवानिवृत्त उपविभागीय अभियंता
पुणे

आदर्श व्यक्तिमत्व मा. कपोले साहेब

राज्याच्या प्रशासकीय सेवेमध्ये काम करीत असताना अनेक सहकारी अधिकारी, कर्मचारी आणि जनतेमधील वेगवेगळ्या समाज घटकातील लोकांचा संपर्क येत असतो. त्या प्रत्येकांची ओळख राखणे अवघड असते. परंतु त्यापैकी काही असे असतात की काम करण्याच्या आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे कायम ते आपल्या स्मरणात रहात असतात.

महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील असे एक अधिकारी म्हणजे जलसंपदा विभागातील कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे अंतर्गत कार्यकारी संचालक पदावर कार्यरत असलेले इंजि. अतुल कपोले साहेब होत. मी महामंडळांतर्गत कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असताना माझे वरिष्ठ साहेब म्हणून ते कार्यरत आहेत. आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून आणि सामाजिक भान ठेवून काम करणारे ते अधिकारी असल्यामुळे त्यांच्या कामातील वेगळेपणा आणि गतीमुळे माझ्याही कामात गती आणि वेगळेपणा तयार झाला आहे. साहेबांकडून तो मला आत्मसात करता आला. साहेबांचा स्वभाव नेहमी हसतमुख पण एकदम कडक वाटत असला तरी मनाने मात्र अतिशय प्रेमळ आहेत. त्यामुळे त्यांच्यासोबत काम करताना एक वेगळाच आनंद मिळतो.

कोकण पाटबंधारे विकास महामंडळात कामे करताना सर्व अधिकारी व कर्मचारी यांची अतिशय चांगली अशी टीम तयार झाली आहे. त्यामुळे कोकण विभागातील विकास कामे वेगाने मार्गी लागली आहेत. प्रशासकीय अधिकारी, प्रदेशातील शासकीय यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी जर एकाच ध्येयाने प्रेरित होऊन एकाच दिशेने काम करीत असतील तर निश्चितच विकास कामांना गती प्राप्त होते. ही शिकवण आमचे कपोले साहेब यांनी आमच्या सहकाऱ्यांच्या मनावर बिंबवली आहे. इंजि. अतुल कपोले साहेब यांनी कोकण पाटबंधारे महामंडळांतर्गत शेतकऱ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रदेशातील विविध धरण कामांना गती देऊन वेगाने काम केले आहे. सामाजिक बांधिलकीचे भान असलेला अधिकारीच अशा पध्दतीचे स्वत: पुढाकार घेऊन काम करु शकतो. त्यानुसार मुंबई व आसपासची उपनगरे तसेच मुंबईच्या आसपासच्या महानगरपालिका हद्दीतील जनतेला पाणी टंचाईला सामोरे जायला लागू नये यासाठी शासन स्तरावर विविध धरण योजनांच्या कामाला गती देण्यासाठी त्यांनी अपार कष्ट घेतले आहेत. यासाठी शासनाच्या विविध खात्यांशी संपर्क साधून प्रकल्पांमधील अडचणी समजावून घेऊन त्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे बहूतांशी कामे मुदतीत पुर्ण देखील करण्यात आली आहेत.

इंजि. कपोले साहेब यांनी जेथे जेथे वरिष्ठ अधिकारी म्हणून सेवा केली, त्या त्या ठिकाणी त्यांनी आपले कसब पणाला लावून काम केल्याचे दिसून येते. मा. कपोले साहेबांनी केवळ सरकारी अधिकारी म्हणून नव्हे तर लोकांचे हित लक्षात घेऊन अधिकारी व कर्मचारी यांचे भले व्हावे म्हणून प्रामाणिकपणे काम केले आहे. एक प्रामाणिक आणि शिस्तबध्द रितीने काम करणारा अधिकारी म्हणून त्यांनी सेवा केली आहे. सुमारे ३० वर्षे जन सेवा केल्यानंतर आता ते शासकीय सेवेतून निवृत्त होत आहेत. त्या बद्दल मला एका कवितेच्या ओळी आठवतात.

शब्दापेक्षा कृती महान हे तुम्ही जाणिले गरिबांसाठी,
शेतकऱ्यांसाठी, तुम्ही स्वत:ला वाहून घेतले
हात दिला ज्यांना कोणी नाही, त्यांचे तुम्ही आधार
माणूस म्हणून जगण्याचा, दिलात खरा विचार
तुमचा दरारा मोठा, तुमचा शब्द खरा
न्याय मिळवून देण्यासाठी, तुम्ही उभे तटस्थ खरा
कित्येकांनी पाहिले तुमच्यात एक मार्गदर्शक गुरुवर्य.

आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवेनंतर आता आपण निवृत्त होत आहात. सेवानिवृती नंतरचे आपले आयुष्य सुखाचे, आनंददायी आणि आरोग्यदायी जावो हीच सदिच्छा व्यक्त करतो!

इंजि. विनोद मुंजाप्पा
कार्यकारी अभियंता (ल.पा.कक्ष)कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे

अतुल म्हणजे अतुलनीय, अजोड, अमर्याद व अथांग !

मा. श्री. अतुल कपोले साहेब, कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या सेवा निवृत्तीपर माझे दोन शब्दात मनोगत व्यक्त करीत आहे.

अतुल! या नावातच सर्व काही दडलेले आहे. अतुल म्हणजेच अतुलनीय, अजोड, अनुपम, अमर्याद, अथांग किंवा अद्वितीय आणि Incredible असा. साहेबांच्या बाबतीत त्यांच्या नावाशी सुसंगत असे त्यांचे कार्य आहे.

माझी व मा.कपोले साहेबांची पहिली प्रत्यक्ष भेट एका तारांकीत प्रश्नाच्या ब्रिफिंगच्या वेळी झाली. तेव्हा मी पालघर पाटबंधारे विभाग, मनोर येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होतो व मा. कपोले साहेब मंत्रालयात अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत होते. मला साहेबांच्या स्वभावाची फारशी कल्पना नसल्याने जरा शासंकच होतो. मात्र पहिल्या भेटीत मनातील सर्व शंका, प्रश्न आपोआप निकाली निघाले. सरांचा शांत स्वभाव, समोरच्याला समजून घेण्याची त्यांची कार्यपध्दत, त्यांच्याप्रती आदर निर्माण करण्यांस पुरेशी ठरली. त्यानंतर सरांची कार्यकारी संचालक म्हणून कोंकण पाटबंधारे महामंडळ, ठाणे तेथे नेमणूक झाल्याने माझी व सरांची जवळीक कामनिमित्ताने आणखी दृढ झाली.

माझ्या विभागांतर्गत सुरु असलेली कवडास उदंचन बंधारा, कोल्हापूर पद्धतीचे एकूण ५ बंधारे, मुख्य धरण व कालवे दुरुस्तीची कामे (M² R) तसेच MMR¦A व वरिष्ठांशी सहसंबंध प्रस्थापित करण्यात महत्वाची भूमिका बजावलेली आहे. अत्यंत निकडीच्या वेळी त्यांची असलेली उपलब्धता तसेच वेळोवेळी कामांच्या बाबतीत वेळेचे कोणतेही बंधन न ठेवता त्यांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन आम्हाला प्रत्येक टप्प्यावर यशाच्या शिखरावर पोहचण्यास मैलाचा दगड ठरलेले आहे. तसेच सी. डी. ओ. मेरी नाशिक येथे संकल्पनासाठी वेळोवेळी जातीने लक्ष घालून व तेथील वरिष्ठांशी प्रत्यक्ष चर्चा करुन मोलाची मदत केलेली आहे.

त्यानंतर माझी बदली भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर येथे झाल्याने मी भातसानगर येथे कार्यरत असतांना तेथील स्थानिक समस्यांबाबत वेळोवेळो सरांचे मौलीक मार्गदर्शन प्राप्त झालेले आहे. स्थानिक कष्टकऱ्यांचे प्रश्न, शेतकरी आंदोलने, तांत्रिक समस्यांचे निराकरण, मोठ्या कामांच्या बाबतीतील मंजुरी. निर्णय घेण्याची संपुर्ण मुभा या भूमिकेमुळे मला ब-याच गोष्टी साध्य करता आलेल्या आहेत. जसे की, सरांच्या पाठिंब्यामुळे भातसानगर येथील वीज बीलात मोठी बचत करणे शक्य झाले आहे. त्यात वार्षिक जवळ जवळ २५ लाख रुपयांची बचत होत आहे. भातसानगर येथील भातसा धरणातून मुंबई महानगरपालीकेस मोठ्या प्रमाणावर पेयजल पुरवठा करण्यात येतो. मध्यंतरीच्या

काळात वीज निर्मिती केंद्र दुरुस्तीसाठी बंद असतांना कलव्यातून पाणीपुरवठा बंद करण्याची वेळ आल्याने महापालीकेचा पाणीपुरवठा विस्कळीत होण्याची परिस्थिती निर्माण झालेली असताना मा. कपोले साहेबांच्या कार्यतत्परतेमुळे नवीन वळण कालव्यास तात्काळ मंजुरी देण्यात आल्याने कोणतीही आपत्कालीन परिस्थीती उत्पन्न निर्माण झाली नाही.

माझ्या विभागाच्या अधिनस्त चालू असलेल्या मुमरी व काळू पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत; मा. साहेबांच्या मार्गदर्शनामुळे व सततच्या घेतलेल्या निर्णायक आढाव्यामुळे मुमरी बांधकामाधीन प्रकल्पाचे भूसंपादन १०० टक्के पूर्ण झालेले असून प्रकल्पाचे बांधकाम ६० टक्क्यांच्या जवळपास पूर्ण करण्यांत यश आले आहे. लवकरच धरणाच्या उर्वरित बांधकामास साहेबांच्या पाठिंब्यामुळे सुरुवात होत आहे. तसेच काळू पाटबंधारे प्रकल्पांस लागणारी वनजमीन हस्तांतरण व भूसंपादन प्रक्रिया साहेबांच्या सहकार्यामुळे, मार्गदर्शनामुळे व त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या आढाव्यामुळे १०० टक्के साध्य करण्याचे उद्दीष्ट्य असतांना ५० टक्क्यांपर्यंत पुर्तता झाली असून त्याच्या सी. डी. ओ. मेरी या संस्थेकडून संकल्पन (Designs) प्राप्त करुन घेतल्या असून सदर प्रकल्पाची मुहुर्तमेढ मा. साहेबांच्या कारकीर्दीत व त्यांच्या हातून करावयाचे आमचे नियोजन काही अपरिहार्य कारणामुळे अर्धवट राहीले आहे. याची मला कायमच अत्यंत खंत राहील.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम या मोहीमेंतर्गत माझ्या विभागाने राज्यस्तरावर २ रा क्रमांक पटकावला असून विभागास हा गौरव प्राप्त होण्यास मा. साहेबांची प्रेरणा, मार्गदर्शन व पाठिंबा अतिशय मौलीक ठरला आहे. त्याला माझ्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी तू फक्त लढ म्हण या उक्तीप्रमाणे प्रतिसाद देऊन् आकाशाला गवसणी घालणारे यश पदरात पाडले असून साहेबांची कौतुकाची पाठीवरील थाप निश्चितच आम्हाला भविष्यात अधिक प्रेरणादायक ठरेल यात तीळमात्र शंका नाही.

मा. कपोले साहेबांच्या कार्यक्षेत्रात येणा–या सर्व समस्यांवर त्यांच्याकडे सदैव तोडगा तयार असतो. अगदी नावाप्रमाणे त्यांच्यातील तत्परता सजग असते. त्यामुळे सहकऱ्यांना काम करतांना कोणतीही अडचण किंवा उणीव भासत नाही तर प्रत्येक जण अगदी उत्साहाने व धडाडीने काम करण्यास प्रेरीत होतो. अशा या महान विभूतीची त्यांच्या होणा–या सेवानिवृत्तीने जलसंपदा खात्यात एक प्रकारची पोकळी निर्माण होणार असून त्यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शनास आम्हाला मुकावे लागणार आहे. मात्र मी आशा करीतो की,

मा. कपोले साहेब त्यांच्या सेवापुर्ती पश्चातही आपले मौलीक मार्गदर्शन आमच्यासाठी सदैव करीत राहतील.

आजच्या सेवापुर्तीच्या निमित्ताने मला मा. साहेबांसोबत काम करण्याची संधी मिळाली हे मी माझे भाग्यच समजतो. मी त्यांना दीर्घ आयुष्य, उत्तम आरोग्य व त्यांच्या स्वभावातील उत्तम गुण म्हणजे शांत व संयमीपणा कायम अबाधीत राहो ही मनोकामना परमेश्वराकडे करतो.

जय हिंद!

इंजि. रवी भारत पवार,
कार्यकारी अभियंता,
भातसा धरण व्यवस्थापन विभाग, भातसानगर
जि.ठाणे

ज्यांच्या नावातच अतुलनीय कार्याचे रहस्य दडलेले आहे असे अतुल कपोले साहेब!

सन १९९४ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये सहाय्यक कार्यकारी अभियंता पदी निवड झाल्यानंतर श्री. अतुल कपोले साहेबांनी कुकडी प्रकल्पांतर्गत श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर येथे सेवा दिली. त्यानंतर, घाटघर प्रकल्प, शहापूर, जि. ठाणे येथे मुख्य अभियंता श्री. एच. टी. मेंढेगिरी साहेब यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याची संधी मिळाली. सन १९९८ मध्ये कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती झाल्यावर कपोले साहेब जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे रुजू झाले. सन १९९९ मध्ये नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस कालवा प्रकल्प विभाग,

वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे बदलीने हजर झाले.

उपरोक्त वर्णन केल्यानुसार, कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत असतांना अगदी सुरुवातीच्या काळात साहेबांची नियुक्ती नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस कालवा विभाग, वैजापूर येथे झालेली होती. सन १९७०-७५ च्या दरम्यान रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू झालेला व त्यानंतर नानाविध अडचणींमुळे बंद पडलेल्या या नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस कालवा प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात साकारण्याचे आणि खऱ्या अर्थाने तडीस नेण्यासाठी ज्या अधिकाऱ्यांनी मोलाचे कष्ट उपसले, त्या सर्वांमध्ये कपोले साहेबांचे नाव अत्यंत अग्रभागी असेल. रो.ह.यो. अंतर्गत सुरु करण्यात आलेली आणि त्यानंतर अर्धवट व बंद असलेली एक्सप्रेस कालव्याची कामे, त्यांमध्ये असलेल्या विविध प्रशासकीय व तांत्रिक अडचणी, आवश्यक निधीची तरतूद, या सर्वांमध्ये साहेबांनी जीव तोडून मेहनत घेतली. कामे पुन्हा सुरु केली आणि सुरु केलेली कामे गुणवत्तापूर्वक आणि विहित वेळेत पूर्ण

देखील केली.

नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस कालव्याचे काम करतांना संधानक Weigh Batching Plant च्या सहाय्यानेच करण्याबाबत साहेबांचा कटाक्ष होता. त्यामुळेच; Aqueduct, Box Culvert, Super Passage, Cross Regulator Structure, इत्यादी क्लिष्ट कामे अत्यंत गुणवत्तापूर्वक आणि विहित वेळेत पूर्ण होऊ

शकली. कंत्राटदारांना आदरयुक्त चांगली वागणूक तर दिलीच सोबत कंत्राटदारांच्या मनामध्ये आत्मविश्वास देखील निर्माण केला. प्रकल्पातील सर्व कंत्राटदारांमध्ये साहेबांच्या प्रति एक आदर युक्त दरारा निर्माण झालेला होता.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर आणि गंगापूर या तालुक्यातील अवर्षण प्रवण भागांसाठी वरदान ठरलेला आणि साहेबांच्या सेवा काळातील मैलाचा दगड ठरावा, असे ज्या प्रकल्पाचे वर्णन करता येईल तो प्रकल्प म्हणजे नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस कालवा प्रकल्प होय!. वैजापूर आणि गंगापूर या तालुक्यातील अवर्षण प्रवण भागांतील शेतकऱ्यांसाठी मृगजळ भासेल अशा अपूर्ण अवस्थेतील आणि बंद पडलेल्या प्रकल्पामध्ये जीव ओतण्याचे काम साहेबांच्या कार्यकाळात झाले. पूर्ण झालेल्या कामांची गुणवत्ता तर आजमितीस देखील विजोड अशी आहे. खऱ्या अर्थाने त्या भागातील शेतकरी सुजलाम सुफलाम झालेला आहे आणि या वाटचालीत श्री कपोले साहेबांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे.

तात्कालीन लोकप्रतिनिधी आ. शंकरराव कोल्हे (कोपरगाव विधानसभा मतदार संघ) आणि आमदार आर. एम. वाणी (वैजापूर विधानसभा मतदार संघ) यांच्या अडचणी व शंका समजून घेऊन, त्या दूर करतांना आणि समन्वय ठेवतांना साहेबांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागलेली होती. मात्र, सदरचा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर सर्व संबंधित लोकप्रतिनिधींची कौतुकाची थाप साहेबांच्या पाठीवर अभिमानाने पडली.

नांदूर मध्यमेश्वर एक्सप्रेस कालवा प्रकल्पामध्ये त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल घेऊन, सन २००५ मध्ये तात्कालीन पाटबंधारे खात्याचे मंत्री, श्री. पद्मसिंह पाटील यांनी स्वतःच्या धाराशिव (तेंव्हाचा उस्मानाबाद) जिल्ह्यात श्री. कपोले साहेबांची बदली करवून घेतली. धाराशिव जिल्ह्यात देखील स्वतःच्या कार्यक्षमतेचा परिचय देत श्री. कपोले साहेबांनी सुमारे २०० साठवण तलाव (Storage Tank) आणि कोल्हापूर पद्धतीचे बंधारे गुणवत्तापूर्वक पूर्ण केलेले आहेत. त्यामुळे दुष्काळ प्रवण मराठवाड्याच्या धाराशिव जिल्ह्यात न केवळ भूजल पातळीत वाढ झाली, तर स्थानिक पाण्याचे साठे निर्माण झाल्याने आजूबाजूच्या परिसरातील बळीराजांचे जीवनमान उंचावण्यात मोलाची भूमिका निभावलेली आहे. केवळ खरीप हंगामात पिके घेणाऱ्या शेतकऱ्यास आता रब्बी हंगामात किंवा काही ठिकाणी उन्हाळी हंगामात पिके घेण्यासाठी पाणीसाठ्यांची निर्मिती झालेली आहे.

सन २००७-०८ मध्ये लघु पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्यातील Presidency diivision येथे साहेबांची बदली झाली. मुख्य अभियंता, जलविज्ञान, नाशिक यांचे कडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करणे असो, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचे कडून संकल्पने आणि रेखाचित्रे प्राप्त करून घेणे असो, प्रकल्पासाठीच्या आवश्यक जमिनीचे भूसंपादन असो, किंवा प्रत्यक्ष क्षेत्रीय स्तरावर काम करणे असो, या सर्व बाबींमध्ये जातीने लक्ष घालून आपल्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांना वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन देत श्री. कपोले साहेबांनी सुमारे ७-८ मध्यम पाटबंधारे प्रकल्पांचे काम तडीस नेले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगांव तालुक्यात तयार झालेले ६ साठवण तलाव त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आजही दिमाखात देत आहेत. सोयगांव तालुक्यासारख्या दुष्काळी आणि गरजू शेतकऱ्यांसाठी साठवण तलावांची निर्मिती ही त्या भागातील शेतकऱ्यांच्या जीवनमान उंचावणारी मोलाची कामगिरी ठरलेली आहे.

मी सध्या कार्यरत असलेल्या लघु पाटबंधारे विभाग, नाशिक अंतर्गत पेठ जि. नाशिक या आदिवासी बहुल तालुक्यातील लघु पाटबंधारे योजना ह्या रो. ह. यो. अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. पैकी काही प्रकल्पांचे काम सुमारे ४०-५० वर्षांपूर्वी करण्यात आलेले असल्याने सदरील योजनांच्या सांडव्यातून गळती होत असल्याचे निदर्शनास आले होते. सदर बाब श्री. कपोले साहेबांच्या कानावर घातल्यावर त्यांनी गळती होणाऱ्या अशा सांडव्याकरिता गळती प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून Upstream Jacketing करिता त्वरित निधी

मंजूर केला. सदरच्या सांडव्याकरिता Upstream Jacketing केल्याने सांडव्यातून गळती जवळजवळ थांबलेली आहे. परिणामी धरण साठा अबाधित राहिल्याने, सदरच्या ल. पा. योजनांमध्ये शेतकऱ्यांना उन्हाळी पिकांकरिता अतिरिक्त पाणी शिल्लक राहत आहे. श्री.कपोले साहेबांनी त्यांच्या सेवाकाळात केलेल्या दैदिप्यमान व उत्तुंग कामकाजाची दखल शासन स्तरावर घेण्यात आली व त्यांना महाराष्ट्र शासनाचा मानाचा असा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार देऊन त्यांना गौरविण्यात आलेले आहे.

श्री कपोले साहेबांकडे कोणतेही काम किंवा मार्गदर्शनासाठी गेलेला व्यक्ती समाधान झाल्याशिवाय परत येत नाही. परत येतांना हसतमुखाने त्याला आपले काम झाले अश्या अविर्भावातच परत येतो. विषय कितीही छोटा असो वा मोठा, समोरच्या व्यक्तीचे म्हणणे नीट ऐकून घेऊन त्यावर उचित असे मार्गदर्शन साहेब करत असतात. त्यामुळेच त्यांच्याकडे अडचण घेऊन जाणारी तणावाखाली असलेली व्यक्ती देखील Normal होऊनच हसतमुखाने दालनाच्या बाहेर येते.

श्री. कपोले साहेबांचा स्वभाव अत्यंत मधुर, मृदू, शांत व समाधानी दिसतो. त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीच हास्य निरसत असते आणि जिभेवर सरस्वती नाचते. त्यांच्या सोबत अनेक वर्षे काम केलेली मंडळी सांगतात की, साहेबांना कधीही गंभीर चेहरा करून कामकाज करतांना पहिलेले नाही. स्वतःला तर ताण तणावापासून दूर ठेवतातच पण इतरांवर देखील कामाचा कोणताही ताणतणाव येणार नाही यासाठी ते दक्ष असतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने साहेब Team Leader म्हणून कामकाज करतात. त्यामुळेच की काय, एका वेळी दोन-दोन महामंडळांच्या कार्यकारी संचालक पदाचा कार्यभार ते लीलया पेलतात.

अवघड किंवा क्लिष्ट वाटणाऱ्या गोष्टी समजून घेऊन, त्यातले बारकावे टिपण्यात साहेबांचा हातखंडा तर आहेच परंतु त्यानंतर आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना तितक्याच सहजतेने सदरचा विषय समजावून सांगण्याची आणि कामे विहित वेळेत पूर्ण करण्याची हातोटी देखील साहेबांकडे आहे. अपुऱ्या मनुष्यबळाचा विचार न करता आहे त्या मनुष्यबळाच्या जोरावर, अधिनस्त कर्मचाऱ्यावर विश्वास ठेवून, त्यांना वेळोवेळी प्रोत्साहित करून, त्यांच्या करवी उत्कृष्ट काम घडवून आणण्याचे कौशल्य श्री. कपोले साहेबांकडे आहे.

खात्याचे मंत्री असो की, त्यांचे सोबत काम करणारा शिपाई, सर्वांशी अगदी सौजन्याने वागण्याचे कौशल्य साहेबांच्या ठायी आहे. जलसंपदा विभागात स.का.अ. ते कार्यकारी संचालक असा प्रवास करतांना वरिष्ठ, कनिष्ठ, कंत्राटदार तसेच राजकीय नेते मंडळी या सर्वांसोबत श्री. कपोले साहेबांचे संबंध अत्यंत मधुर आणि सहृदयी राहिलेले आहेत. त्यांच्या बरोबर काम केलेली मंडळी साहेबांसोबतच्या कामकाजातील अनुभवाबाबत, साहेबांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आणि साहेबांच्या स्वभाव वैशिष्ठ्यांबाबत भरभरून बोलत असतात. श्री. कपोले साहेबांचा पूर्ण सेवा काळ निष्कलंक राहिलेला आहे. हिच साहेबांची खरी जमा पुंजी आहे असे वाटते.

अशा सात्विक व्यक्तिमत्वाच्या अधिकाऱ्यास आणि मार्गदर्शकास भावी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!. त्यांच्या उत्तम व निरामय आरोग्यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना.

इंजि.निलेश प्रकाश पाटील
कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग, नाशिक

मा. अतुल कपोले : एक प्रगल्भ आणि प्रतिभावान अभियंता!

श्री अतुल कपोले साहेबांची व माझी प्रथम भेट नांदूर मधमेश्वर कालवा विभाग वैजापूर येथे सन १९९९ मध्ये झाली. सहाय्यक अभियंता श्रेणी १ म्हणून माझी नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र १ ला पहिली नियुक्ति झाली होती. श्री कपोले साहेब त्यावेळी नांदूर मधमेश्वर कालवा विभाग क्र २ येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. श्री कपोले साहेब हे अत्यंत सकारात्मक, अचूक नियोजन क्षमता, मृदू स्वभावासहित धाडसी गुण असलेले अभियंते आहेत.

सदोदित काम करीत रहाणे, आपल्या हाताखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पालकत्व स्वीकारणे, मोठ मोठी अभियांत्रिकी कामे करण्यास प्रोत्साहन देणे हा त्यांचा स्थायीभाव आहे. अशा अधिकाऱ्यासमवेत काम करण्याचा अनुभव आल्हाददायकच!

इंजिनियर या शब्दाचा परिपूर्ण अर्थ माहित असलेल्यांपैकी ते एक आहेत. इंजिनियर म्हणजे नियोजन, चाणाक्षपणा, कल्पकता, धाडस यासहित स्वहित बाजूला ठेवून लोकोपयोगी कामांची हिरीरीने अंमलबजावणी अशी माझ्या दृष्टिकोनातून इंजिनियरची व्याख्या आहे. ही व्याख्या कपोले साहेबांसाठी तंतोतंत बसते ती त्यांच्या कार्यशैलीमुळेच!

नांदूर मधमेश्वर जलद कालव्याचा गंगापूर तालुक्यातील शाखा क्र. २ वरील स्टेट हायवे क्रॉसींग हे स्ट्रेटीफिकेशनचा अभ्यास करुन रॉक बोल्टींगसह टनेल पर्याय वापरण्याची सुचना व अंमलबजावणी हे त्यांच्या सुरुवातीच्या नोकरी कालावधीतील नाविन्यपूर्ण काम होय! येथूनच त्यांच्या तांत्रिक बाबीच्या अभ्यासाची व ते पूर्ण करण्याच्या वेगळेपणाची जाणिव जलसंपदा खात्याला दिसून आली.

तद्नंतर सन २००४ ते २००८ या कालावधीत लघू पाटबंधारे विभाग क्रमांक १ छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकारी अभियंता असताना मा.व्ही.व्ही. गायकवाड साहेब यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी केलेल्या गोदावरी नदीवरील आपेगाव व हिरडपूरी उच्च पातळी बंधाऱ्याची कामे त्याचप्रमाणे मौजे आपेगाव ता. पैठण येथील गोदावरी नदीवरील संत ज्ञानेश्वर मंदिराच्या घाटाच्या कामाचे नियोजन व संकल्पन, इंस्टिट्युशन ऑफ इंजिनियर्स लोकल सेंटरच्या छत्रपती संभाजीनगर च्या सभागृहाचे काम अशी वैशिष्ट्यपुर्ण कामे त्यांच्या कार्यकाळात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात झाली.

मृदू स्वभाव असूनदेखील त्यांच्या समवेत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारांना त्यांचा धाक वाटे. साहेबगिरी करताना आपले समवेत काम करणाऱ्याविषयी स्नेह कसा ठेवावा यात त्यांचा चांगला हातखंडा आहे. म्हणूनच एक अधिकारी व व्यक्ति म्हणून त्यांचे वेगळेपण दिसून येते.

माझ्या सेवाकाळातील विशेष म्हणजे सन २००७ मध्ये त्यांना व मला राज्य शासनाचा उत्कृष्ट अभियंता पुरस्कार एकाचवेळी प्राप्त झाला आहे. अशा या प्रतिभावान अभियंत्याला सेवापूर्ती निमित्त शुभेच्छा देतो. त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे पुढील आयुष्यासाठी निरोगी दीर्घायुष्य चिंतितो.

ॲड. इंजि.राजेंद्र काळे
से.नि.अधीक्षक अभियंता तथा
विद्यमान ॲडव्होकेट मा. उच्च न्यायालय
छत्रपती संभाजीनगर

मा. कपोले साहेब एक उत्तम प्रशासक

माननीय श्री अतुल कपोले साहेब व माझी भेट पाच वर्षांपूर्वी मी जेव्हा पदोन्नतीने मंत्रालयात हजर झालो तेव्हा झाली आणि गेल्या पाच वर्षातील साडेचार वर्ष (दोन वर्षे सहसचिव तथा मुख्य अभियंता व अडीच वर्षे कार्यकारी संचालक) माझे वरिष्ठ म्हणून त्यांचे मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मला मिळाली. ती आजही कायम आहे.

माझ्या पदोन्नती पूर्वी मंत्रालयात काही कामकाजा निमित्त येत असताना जलसंपदा विभागात श्री कपोले साहेब दिसायचे. परंतु हेच कपोले साहेब आहेत असे परिचय नसल्यामुळे माहीत नव्हते. त्यावेळी त्यांच्याकडे बघून साहेब अत्यंत धीर गंभीर व कडक शिस्तीचे असावेत असे वाटत होते. परंतु जस जसे त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत गेलो तसा त्यांचा अत्यंत मनमिळाऊ व सर्वांना मदतीचा परंतु तितक्याच शिस्तप्रिय स्वभावाचा प्रत्यय आला.

मी मंत्रालयात रुजू झाल्यावर मला कपोले साहेबांच्या सहसचिव तथा मुख्य अभियंता (दक्षता व प्रकल्प) अंतर्गत पदस्थापना दिली असता त्यांच्या सदिच्छा भेटीसाठी केबिन बाहेर उभा होतो. त्यावेळी साहेब काहीतरी स्वतः लिहीत होते. तरी त्यांच्या शिपायाने सांगितले की जा आत काही प्रॉब्लेम नाही. तेव्हा डायरेक्ट दरवाजा उघडला व आत जाताना, सर येऊ का असे विचारले. तेव्हा धीर गंभीर नजरेने त्यांनी तिथूनच मान हलवून दहा-पंधरा मिनिटे थांबायला सांगितले. कारण त्यांना मी त्यांच्याकडे हजर झालो आहे हे माहीतच नव्हते. त्यांनीही कधी मला बघितलेले नव्हते. त्यांना मी नेहमीप्रमाणेच कोणीतरी व्हिजिटर वाटलो होतो. मग दहा-पंधरा मिनिटे वाट बघून पुन्हा मी केबिनमध्ये जाण्याचा प्रयत्न केला तर लिखापढीमध्ये व्यस्त असलेल्या कपोले साहेबांनी रागाने , ए थांब जरा. असं म्हणताच मी परत माझ्या जागी येऊन बसलो. त्यानंतर त्या दिवशी साहेबांना भेटलो नाही. हा प्रसंग नमूद करण्याचा हेतू एवढाच की आजही साहेब स्वतः काही लिहीत असतील (पत्र, सीआर, किंवा इतर काही महत्त्वाच्या कागदपत्रांवर दुरुस्ती)तर त्यांना डिस्टर्ब केलेले आवडत नाही. त्यामुळे आजही साहेबांच्या केबीनमध्ये जाताना बाहेर शिपाई लोकांना मी पहिले विचारून घेतो की साहेबांचं काही लिखाण काम चालू आहे का किंवा काही फोन चालू आहे का? उत्तर नाही आलं तरच केबिनमध्ये प्रवेश करायचा नाही तर थोडा वेळ वाट बघायची. हा एक त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांपैकी एक आहे. ते जेव्हाही काही पत्राचा मसुदा तयार करत

असतात किंवा काही सुधारणा करत असतात तेव्हा ते दोन-चार पानंही स्वतःच्या हाताने सहज लिहून काढतात.

दुसऱ्या दिवशी सकाळीच साहेब थोडे मोकळे असताना साहेबांची भेट घेतली, माझा परिचय दिला की मी आपल्याकडे हजर झालो आहे. आदल्या दिवशीचा प्रसंग साहेबांकडे व्यस्त व्यापामुळे कदाचित साहेबांच्या लक्षातही नव्हता आणि मीही आठवण करून दिली नाही. मंत्रालयात काम करण्याची सर्व क्षेत्रीय अभियंत्यांना थोडी फार भीती असते. त्यामुळे पहिले साहेबांना सांगितले की मी आत्ताच पदोन्नत झालो असून इथली कार्यपद्धती मला काही माहीत नाही. थोडा कॉन्फिडन्स यायला किमान एक ते दोन महिने लागतील. त्यावर साहेबांनी अत्यंत शांततेत मला सांगितले, तुझ्या पद्धतीने काम चालू कर, वेळ घे जेवढा पाहिजे तेवढा, मंत्रालय कामकाजाचे रूल्स ऑफ बिझनेस वाच, शक्यतो टेबलवर कुठलीही फाईल संध्याकाळी जाताना प्रलंबित ठेवू नको म्हणजे कामाचा लोड वाढणार नाही. अशा पद्धतीने इतर बाबींवर दहा-पंधरा मिनिटं मार्गदर्शन झाल्यावर मी माझ्या कामाला लागलो. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली दोन वर्षे कालावधीत बरेच प्रकल्प प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

श्री कपोले साहेबांचे दुसरे स्वभाव वैशिष्ट्य असे आहे की त्यांच्या लेखनामध्ये त्यांचे लेखन शाईच्या Lamy कंपनीच्या पेनने होत असते. तसं त्यांच्या हस्ताक्षराची साईजही छोटीच असते. परंतु रेग्यूलर छोट्या पेक्षाही छोट्या हस्ताक्षरात लिहायचे असल्यास ते पेन उलटा धरून उलट्या निबेने लिहितात. त्यांचे असे छोटे हस्ताक्षर बहुदा विभागात कोणाचेही नसावे. हस्ताक्षर कितीही लहान असले तरी ते स्वच्छ, सुंदर आणि कोणालाही सहज समजणारे असे असते.

तिसरे स्वभाव वैशिष्ट्य म्हणजे कुठलेही पत्र, शासन निर्णय, धारिका यांचे अत्यंत बारकाईने वाचन करणे. त्यांच्याकडून गेलेला कुठलाही कागद, धारीका यांचे इतके बारकाईने वाचन केलेले असते की परत त्यांच्याकडे चर्चेला गेल्यावर ते सांगणार तू नीट बघ, नीट वाच, काय लिहिलं आहे ते! ते कुठेतरी आहे, या फाईलला आहे! इत्यादी आणि ते व्यवस्थित बघितल्यावर आपल्याला सापडणारच. एखादी फाईल परत एक वर्षांनी जरी परत त्यांच्याकडे गेली तरी त्यांच्या पूर्ण किंवा पुसट लक्षात असायचं की कुठेतरी महत्त्वाचं नोटींग झालेलं आहे. ते त्यांच्या अत्यंत बारकाईने शब्दाने शब्द वाचायच्या सवयीमुळेच.

त्यांचे आणखी एक महत्त्वाचे स्वभाव वैशिष्ट म्हणजे कितीही उशीर झाला असला तरी एखाद्या प्रकरणाचा त्यातील सर्व कागदपत्रे बघून खात्री झाल्याशिवाय कुठलाही निर्णय न घेणे. कधी कधी साहेबांनी कुठल्या विषयावर **चर्चा** असे म्हटले असल्यावर प्रकरणाच्या माहितीसह व धारिकेसह आम्ही संध्याकाळी ऑफिस संपायच्या वेळेला धारिका, प्रकरण चर्चेला गेल्यावर साहेब निघायच्या तयारीत असायचे. आम्हाला वाटायचं होऊन जाईल आता ५-१० मिनिटात फाईल. पण माझा अनुभव असा आहे की बऱ्याच वेळा कंटाळा आला

असताना देखील एकदा साहेब बसले की एक दीड तास सगळी माहिती घेऊन धारिकेतील महत्त्वाचा सगळा पत्रव्यवहार तपासल्याशिवाय कधीही कुठलीही धारिका पुढे पाठवली अथवा निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे कितीही उशीर झाला किंवा कंटाळा आला आहे म्हणून नीट बघून समजून घेतल्याशिवाय कुठलेही प्रकरणावर निर्णयावर यायचे नाही हा त्यांचा मूळ स्वभाव.

पुढचे स्वभाव वैशिष्ट्य म्हणजे हाताखालील सर्व अधिकारी - कर्मचारी यांना उच्च पातळीवरील बैठकांमध्ये त्यांचे स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य देणे. याचा अनुभव म्हणजे मंत्रालयातील माननीय मंत्री महोदय, माननीय अतिरिक्त मुख्य सचिव, माननीय सचिव यांच्या बैठकांमध्ये एखाद्या विषयावर काही चर्चा चालू असेल तेव्हा बैठकीत बसलेल्या त्यांच्या हाताखालील सर्व अधिकाऱ्यांना त्यांचे वैयक्तिक मत मांडण्यापासून त्यांनी कधीही अडविले नाही. भले ते चुकीचे असले तरीही सर्वांचे म्हणणे ऐकून झाल्यावर ते त्यांची स्वत:ची वैयक्तिक मते बैठकीमध्ये वरिष्ठांसमोर मांडत होते. केवळ त्यांच्या या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांमुळेच मला माझ्या मंत्रालयीन कार्यकाळात आत्मविश्वासपूर्वक काम करण्याची संधी मिळाली. याबाबत काही कमी महत्त्वाच्या बैठकांना ते स्वतः म्हणायचे, जा तुम्ही अटेंड करा बैठक. प्रत्येक वेळेस मी असल्यावर तुम्हाला फ्रीली काही गोष्टी/ तुमचे मुद्दे मांडता येत नाहीत. परंतु ते बैठकीला असताना देखील कधी त्यांनी कोणाला मी असताना तुम्ही बोलू नका असे कधीही सांगितले नाही.

पुढील स्वभाव वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे सह्याद्री पर्वताच्या ढाली सारखे संरक्षण. मंत्रालयीन कामकाज असो अथवा कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कामकाज, साहेब आमचे वरिष्ठ असल्यामुळे बऱ्याच काही लीगल क्रिटिकल केसेस संदर्भात आमचे ज्ञान तसेच पूर्व इतिहासाची माहिती शून्य असताना देखील त्यांनी एकट्याने सर्व ड्राफ्टिंग पासून प्रकरण वरिष्ठ स्तरावर प्रेझेंट करण्याची जबाबदारी समर्थपणे पार पाडली आहे. कुठल्याही जटील विषयाचे वरिष्ठ पातळीवरील बैठकांमध्ये सादरीकरण अत्यंत साधे पद्धतीने व आत्मविश्वास पूर्वक समजावून सांगण्याचे त्याचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. असे दोन-तीनच अधिकारी मी माझ्या पंधरा वर्षाच्या नोकरीतील कालावधीत बघितले आहेत. त्यामध्ये श्री कपोले साहेब हे नेहमीच अग्रस्थानी राहतील. क्षेत्रीय स्तरावर देखील कार्यकारी संचालक म्हणून नियमित महत्वाच्या प्रकल्पांना भेटी देणे, प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने स्वतः पुढाकार घेऊन इतरांमध्ये ती भावना निर्माण करणे, मुंबई, कोकण व इतर परिसरातील वाढती पाण्याची गरज भागवण्यासाठी भविष्यकालीन प्रकल्पांचे सातत्याने नियोजन करणे यामध्ये देखील श्री कपोले साहेबांचा मोठा वाटा राहिला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण पाटबंधारे विकास महामंडळाने गेली अडीच वर्षे अत्यंत शिस्तबद्ध मार्गक्रमण केले असून भविष्यात होणाऱ्या प्रकल्पातील पाणीसाठ्याच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ साहेबांच्या मार्गदर्शनाखाली रोवली गेली आहे. श्री कपोले साहेबांना सेवानिवृत्तीनिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा!

इंजि.अमोल फुंदे
अधीक्षक अभियंता
उत्तर कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ,
कळवा -ठाणे

कपोले साहेब तर कार्यालयाचे कुटुंबप्रमुख

शासकीय सेवेत काम करीत असताना अनेक अधिकाऱ्यांशी संबंध येत असतो. त्यांच्या अधिकाराखाली काम करीत असताना ऋणानुबंध तयार होत असतात. परंतु बऱ्याचदा असे होते की अशा अधिकाऱ्याबद्दल कधी बोलण्याचा किंवा त्यांच्याविषयी लिहिण्याचा प्रसंग क्वचितच येतो. माझ्या तर आयुष्यातील हा पहिलाच प्रसंग म्हणावा लागेल. कारण इतक्या मोठ्या अधिकाऱ्याविषयी माझ्यासारख्या कर्मचाऱ्याने काय लिहावे असा प्रश्न पडला. परंतु विश्लेषा प्रकाशनचे श्री विजयकुमार मोरे यांनी हिंमत दिली. त्यामुळे हे लहान तोंडी मोठा घास घेण्याचे धाडस मी करीत आहे.

वास्तविक पहाता साहेब जेव्हा कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून रुजू झाले त्यावेळी ते सुरुवातीला कडक शिस्तीचे आणि रागीट असावेत असा उगीचच गैरसमज करुन घेतला होता. परंतु जेव्हा प्रत्यक्ष त्यांच्यासोबत कामकाज सुरु झाले, तेव्हा अतिशय सुखद अनुभव आला. कोणतीही गोष्ट त्यांना विचारली की अतिशय सोपी करुन समजावून सांगतात. कधीही कुणावरही न रागावता कामाचे स्वरुप समजावून सांगतात. त्यामुळे अगदी अल्पावधीतच महामंडळातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे त्यांच्याशी ऋणानुबंध तयार झाले. साहेबांसोबत काम करीत असताना आलेला अनुभव असा की साहेबांचा कामाचा उरक दांडगा आहे. त्यांच्याकडे एकादी फाईल गेली आहे आणि अनेक दिवस ती तिथे पडून आहे असे कधीच झाले नाही. विषय कोणताही असो. तात्काळ फाईलींचा निपटारा करणे हे त्यांच्या कार्यशैलीचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल. मग ते काम कार्यालयातील असो की शेतकऱ्यांचे असो की ठेकेदारांचे असो. साहेबांनी कधीही कुणालाही एकाद्या कामासाठी ताटकळत ठेवले आहे किंवा दहा चकरा मारायला लावल्या आहेत असे तर माझ्या माहितीप्रमाणे कधीही झाले नाही. त्यामुळे साहेबांच्या कार्यशैलीवर सगळेच खूष असतात. कधी कधी तर साहेब बाहेर गावी असतील आणि काही काम अडून राहिले असेल तर साहेब मोबाईल फोन किंवा ईमेलचा वापर करुन काम तात्काळ मार्गी लावत असतात. त्यामुळे कामाची गती निश्चितपणे वाढते. कुणालाही तक्रारीला वाव रहात नाही. त्यामुळे साहेबांकडे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे अशा दोन्ही महामंडळांचा कार्यभार असला तरी टेबलावर फाईल पेडींग पडल्या आहेत असे कधीही झाले नाही. अगदीच कधी काम वाढले तर साहेब उशिरापर्यंत थांबून सर्व फाईल्सचा निपटारा करुनच बाहेर पडल्याचे अनेकदा सर्वांनी पाहिले आहे.

मा.कपोले साहेबांचा स्वभाव शांत, प्रेमळ आणि समजूतदार असला तरी कामाच्या बाबतीत हलगर्जीपणा केलेला त्यांना अजिबात चालत नाही. आपले काम नीट आणि काळजीपूर्वक झाले पाहिजे याविषयी त्यांचा नेहमी कटाक्ष असतो. त्यामुळे साहेबांचा आदरयुक्त दबदबा अगदी कर्मचाऱ्यांपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच अनुभवास येतो. परंतु कर्मचारी छोट्या पदावरचा असो की मोठ्या पदावरचा असो सर्वांच्या प्रश्नांकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन सारखाच असतो. प्रत्येकाच्या समस्या किंवा अडचणीकडे ते बॉस म्हणून न पहाता आपल्या कुटुंबाचा एक घटक समजून ते त्यात सामील होतात. त्यामुळे अवघ्या महामंडळाला ते आपला कुटुंब प्रमुखच वाटतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असताना अतिशय समृध्द असे ज्ञान मिळाले. एका वेगळ्या नजरेतून कामाकडे पाहिले की काम करणे कसे सोपे आणि विना कंटाळा करता येते याची जाणिव त्यांनी करुन दिली. त्यामुळे साहेब एक उत्तम मार्गदर्शक वाटतात.

मा. कपोले साहेबांनी आपल्या कार्यपध्दतीने आणि स्वभावामुळे सर्वांनाच आपलेसे केले आहे. सेवा निवृतीनंतरचे आयुष्य त्यांना सुखसमृध्दीचे आणि आरोग्यदायी जावो अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो!

श्री हेमंत शिनगारे
स्टोअर कीपर
कोकण पाटबंधारे विकास महामंडळ
कार्यालय, ठाणे

उच्च दर्जाचे तांत्रिक ज्ञान असणारा अधिकारी

कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक मा. इंजि. अतुल कपोले साहेब नियत वयोमानानुसार २८ फेब्रुवारी २०२६ रोजी शासकीय सेवेतून निवृत होत आहेत. हे ऐकल्यानंतर त्यांच्यासोबत कामाच्या निमित्ताने व्यतित केलेला कार्यकाल एकाद्या चित्रपटाप्रमाणे डोळ्यासमोर सरकत आहे. त्यांच्यासोबत व्यतित केलेला कालावधी अत्यंत आनंदी, अनेक नवीन गोष्टी शिकवणारा, अनुभव देणारा आणि ज्ञान समृध्द असाच होता. अभियांत्रिकी सेवेत सेवा बजावत असताना आपल्या ज्ञानाचा कशाप्रकारे समाजाला उपयोग झाला पाहिजे? प्रशासन कशाप्रकारे हाताळले गेले पाहिजे? अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासोबत काम करीत असताना कसे वागावे? राजकीय लोकांशी कशा प्रकारे संपर्क असावा अशा बारीक सारीक गोष्टींचे मार्गदर्शन श्री कपोले साहेब यांच्या सोबत काम करीत असताना मिळाले याचा मनस्वी आनंद आहे.

मा. कपोले साहेब पुणे येथे चासकमान विभाग येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असताना त्यांची पहिली भेट झाली. आमचे मंडळ कार्यालय एक होते. त्यामुळे बैठकीच्या निमित्ताने भेट होत असे. परंतु त्यावेळी थेट त्यांच्या हाताखाली काम करीत नव्हतो. त्यानंतर पुढे त्यांनी पीआयडीचा चार्ज घेतल्यानंतर त्यांनी खूप कामे मार्गी लावली. सुरुवातीला त्यांचा स्वभाव मितभाषी आणि धीरगंभीर वाटला. त्यामुळे सहसा त्यांच्या जवळ जायला भीति वाटायची. परंतु जसजसे कामाच्या निमित्ताने जवळ येत गेलो तसतसे त्यांचा स्वभाव उलगडत गेला आणि भीतिची जागा आदराने घेतली. त्यामुळे तिथेच आमची वैचारिक गट्टी जमली. त्यांनी त्यावेळी आम्हाला केलेले मार्गदर्शन पुढे आयुष्यभर उपयोगी पडले. त्यावेळी ते आम्हाला म्हणायचे, आधी आपले दायीत्व न ठेवता जुनी कामे संपवा. त्यानंतर आपोआप नवीन कामे मिळत जातील. अंगावर कर्ज ठेवायचे आणि पुन्हा नवीन कर्ज मागायचे हे काही बरोबर नाही. आधीचे कर्ज फेडा आणि मग नवीन घ्या. यातून कामकाज कसे करावे ? ते कसे असावे ? याचा धडा आम्हाला मिळाला. तोच धागा पकडून आम्ही अक्षरश: झपाटल्यासारखी कामे केली. जवळपास २५ हजार हेक्टर क्षेत्राची महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत नीरा डाव्या कालव्यावर पुनर्स्थापना करण्यात आली. तो काळच झपाटल्यासारखे काम करण्याचा होता. त्या काळात खूप चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. तांत्रिक गोष्टी चांगल्या रितीने आत्मसात करायला मिळाल्या.

श्री कपोले साहेब म्हणजे एक आदर्श व्यक्तिमत्व आहेत. अत्यंत निगर्वी स्वभाव, साधी रहाणी आणि उच्च दर्जाचे तांत्रिक ज्ञान, आपल्या अधिपत्याखालील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन काम करणे, त्यांच्यावर विश्वास दाखवणे, त्यांना पाठबळ देणे, त्यांच्या वैयक्तिक अडचणीच्या वेळी त्यांना मदत करणे अशा कितीतरी गोष्टी त्यांनी टीम लिडर म्हणून कराव्या लागतात त्या त्यांनी अतिशय मनापासून केल्या. त्यामुळे एक चांगली टीम तयार होऊन अतिशय चांगल्या पध्दतीने कामे करता आली. झालेली कामे अतिशय चांगल्या दर्जाची आणि वेगाने पुर्ण झाली. अनेक धरणांची आणि कालव्यांची कामे मार्गी लागली. कालव्यांचे अपग्रेडेशन, मजबुतीकरणाची कामे चांगल्या पध्दतीने झाली. धरणांची कामे करताना कोणती काळजी घ्यावी? कशाप्रकारे काळजी घ्यावी? अशा प्रकारचा बारीक सारीक तपशिल साहेबांकडून शिकायला मिळाला. त्यावेळी खूप कामे मंजूर झाली होती. परंतु कामाच्या बाबतीत साहेबांची शिस्तीची शिकवण अशी होती की आधी हातातली कामे पुर्ण करा. नंतर नव्या कामात सुसुत्रता आणि नियोजन करुन हाती घ्यावीत. साहेबांच्या अशा अचूक मार्गदर्शनाप्रमाणे कामे केल्यामुळे कामाचा वेग तर वाढलाच त्याचबरोबर कामाच्या गुणवत्तेत देखील सुधारणा झाली.

श्री कपोले साहेबांबरोबर काम करणे म्हणजे एक समृध्द होण्याचा अनुभव असतो. अलिकडे निर्माण झालेल्या वातावरणात कोणतेही आरोप न होता काम करणे म्हणजे तारेवरची कसरत असते. परंतु कपोले साहेबांनी

स्वत:ला त्यापासून अगदी अलिप्त ठेवले आहे. त्यामुळे त्यांच्या सोबत काम केल्याचे सार्थक झाले असे मनाला वाटल्यावाचून रहात नाही. त्यांची सेवा ही सर्वदा जनहित डोळ्यासमोर ठेवूनच झाली आहे. त्यांच्या संपर्कात आम्हाला काम करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्यच आम्ही समजतो. साहेबांचा जनसंपर्क दांडगा आहे. त्यांचे केवळ जलसंपदा विभागातच मित्र आहेत असे नव्हे तर शासनाच्या विविध खात्यांमध्ये त्यांचा मोठा मित्र परिवार आहे. एवढेच नव्हे तर महानगरपालिका, महसूल विभाग, पोलीस विभाग, स्वयंसेवी संस्था आणि शेतकरी अशा सर्वांमध्ये त्यांचा मित्र परिवार पसरलेला आहे. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना सर्व विभागांचा समन्वय साधून काम करणे अतिशय सोपे झाले.

श्री कपोले साहेबांकडे बघून विद्या विनयेन शोभते या उक्तीचा प्रत्यय येतो. विनयशीलता आणि नम्रपणा, शासनाचे ध्येयधोरण, शासन निर्णय या सर्वांचा अभ्यास करणारे व्यक्तिमत्व म्हणजे कपोलेसाहेब! त्यांनी जमवलेल्या आयुष्यभराच्या जनसंपत्तीचा त्यांनी वेळोवेळी समाजासाठी, लाभधारकांसाठी योग्य रितीने करुन घेतला. हे कसब त्यांच्याकडे अफलातून होते. त्यामुळेच ते एक यशस्वी अभियंता आहेत, अनेकांची ते प्रेरणा आहेत.

सेवा निवृती ही एक नवीन आवृती असते. साहेब सेवानिवृत्त झाले तरी ते स्वस्थ बसणार नाहीत. त्यांची क्रियाशिलता त्यांना स्वस्थ बसू देणार नाही. त्यांचे संपूर्ण जीवन अनुभव संपन्न आहे. त्यांनी सेवानिवृतीनंतर आपले संपन्न अनुभव शब्दबध्द करावेत. ते एक समृध्द साहित्य तयार होईल अशी मला खात्री वाटते.

श्री कपोले साहेब यांना सेवानिवृती नंतरचे आयुष्य सुखाचे आणि आनंदाचे जावो. त्यांना उत्तम आरोग्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त करतो.

इंजि.राजेंद्र धोडपकर
अधीक्षक अभियंता
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे वि. महामंडळ
छत्रपती संभाजीनगर

भाटघर धरण, भोर, पुणे

उत्तम मार्गदर्शक आणि आधारस्तंभ

मी सहाय्यक कार्यकारी अभियंता असताना तेव्हाचा अहमदनगर आणि आताच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे धरणाच्या क्षेत्रिय भेटीच्या वेळी माझी आणि श्री कपोले साहेबांची पहिली भेट झाली. पहिली भेट प्रकर्षाने लक्षात रहाण्याचे कारण असे की त्यांनी साइटवर भेट दिल्यानंतर निळवंडे प्रकल्पाच्या विविध उपांगाविषयी घ्यायची काळजी आणि सुरक्षा उपाय याविषयी अतिशय ओघवत्या शैलीमध्ये आणि सहज सुंदर शब्दात केलेले सखोल मार्गदर्शन होय! साहेब त्यावेळी पुणे कोथरुड येथील कोयना संकल्पचित्र येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनातून विविध उपांगाचे संकल्पनाच्या दृष्टिकोनातून व प्रत्यक्ष परिचालन करताना वेगवेगळ्या महत्वाच्या बाबी विचारात घेण्याच्या संदर्भात त्यांनी केलेले विवेचन अतिशय माहितीपूर्ण होते. असे म्हणतात ना की फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन! त्या पहिल्या भेटीनंतर साहेबांची प्रतिभा लक्षात राहिली होती.

त्या प्रसंगानंतर सन २०१५ मध्ये पुन्हा एकदा श्री कपोले साहेबांची भेट झाली. त्यावेळी साहेब पुणे पाटबंधारे मंडळ पुणे येथे अधीक्षक अभियंता होते. त्यावेळी मी कोयना बांधकाम विभाग, पाटण जि. सातारा येथे कार्यरत होतो. त्यावेळी देखील ते कोयना धरण बोगद्याबाबत करावयाच्या उपाय योजनाबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आले होते. पुन्हा तोच ज्ञान समृध्दीचा अनुभव आला.

साहेबांशी पुन्हा तिसऱ्या वेळी भेट झाली ती मंत्रालयात! साहेब त्यावेळी मंत्रालयात उपसचिव होते. मी कोकण पाटबंधारे विकास महामंडळात कार्यरत होतो. त्यावेळी विधीमंडळ कामकाज व इतर बैठकांच्या निमित्ताने आमच्या भेटी होत असत. त्या कालावधीत विधी मंडळात मांडले जाणारे प्रश्न, लक्ष्यवेधी याबाबत काही वेळेस प्रत्यक्ष भेटीअंती तर कधी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शांतपणे मार्गदर्शन करीत असत. त्यानंतर माझी पदोन्नतीवर ठाणे पाटबंधारे मंडळ ठाणे येथे बदली झाली. त्यावेळी श्री कपोले साहेब यांच्याकडे मंत्रालयात जलसंपदा विभागाच्या सहसचिव पदाचा कार्यभार होता. त्याचप्रमाणे कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. या दोन्ही ठिकाणचा कार्यभार साहेब अतिशय शांतपणे हाताळत होते.

त्यावेळी कोकण पाटबंधारे विकास महामंडळातील विविध न्यायालयीन प्रकरणे आणि किचकट बाबी श्री कपोले साहेब अतिशय शांतपणे हाताळत होते. त्यांनी शासन नियमानुसार कायद्यांच्या विविध कलमांचा अभ्यास करुन ही न्यायालयीन प्रकरणे कशा पध्दतीने हाताळली याचा मी स्वत: साक्षीदार आहे. प्रत्येक कठीण केसमध्ये त्यांनी अतिशय योग्य असा मार्ग काढला. प्रकरणे प्रॅक्टिकली हाताळली. त्यावेळी कुठल्याही प्रकारचा ताण तणाव न घेता त्यांचे कामकाज सुरु होते. हे पाहून आश्चर्याचा धक्का बसल्यावाचून राहिला नाही. कारण इतक्या तणावाच्या प्रसंगीसुध्दा ते शांत चित्ताने विचार करीत होते आणि मार्ग काढत होते. ही बाब आणि त्यांचे कामकाज आमच्यासाठी प्रेरणादायी असेच होते.

प्रामुख्याने बाळगंगा आणि कोंढाणे प्रकल्पाबाबत कोर्टात व प्रशासकीय बाबतीत मार्ग काढून दिला. पालघर व रायगड जिल्ह्यात आस्तित्वात असणारी सिंचन प्रणाली कार्यक्षम करण्यासाठी कालव्याच्या विविध कामांना मंजूरी दिली. ठेव तत्वावरील कामांचे भूसंपादन आणि वनजमीन, सुप्रमा याबाबत यथोचित मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शासन

स्तरावर या प्रकल्पाना गती प्राप्त करुन दिली. अशा प्रकारे साहेबांनी रखडलेल्या बहूतांश प्रकल्पांच्या समस्या सोडवून प्रकल्प मार्गी लावले. त्यामुळे एकूणच महामंडळाच्या प्रकल्पांना चांगली गती प्राप्त झाली.

श्री कपोले साहेबांचा स्वभाव शांत, संयमी आणि सर्वंकष विचार करण्याची वृत्ती, सर्वांना मार्गदर्शन करण्यासाठी सदैव सज्ज असणे, प्रसंगी कठोर होणे परंतु कुठेही कटूता नसणे ही सगळी त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये आहेत.

माझ्या वैयक्तिक बाबतीत सांगायचे तर माझ्या आयुष्यातील कठीण प्रसंगी व अडचणीच्या वेळी साहेब सदैव माझ्या पाठीशी होते. त्यावेळी मला ते एखाद्या भक्कम आधारस्तंभासारखे वाटले. श्री कपोले साहेबांचे सोबत असणे त्यावेळी वैयक्तिक माझ्यासाठी अतिशय महत्वाचे वाटले. अशा प्रकारे साहेब नेहमीच आपल्या सहकाऱ्यांच्या कठीण प्रसंगात पाठीशी खंबीरपणे उभे रहात असतात. हे मी अगदी स्वानुभवाने सांगतो.

येत्या फेब्रुवारी २०२६ मध्ये श्री कपोले साहेब नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून निवृत होत आहेत. सेवाकाळात त्यांनी अपार कष्ट उपसले आहेत. आता सेवानिवृती नंतर त्यांना आरामदायी आणि आनंदी जीवन लाभो, त्यांना उत्तम आरोग्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि मन:पूर्वक शुभेच्छा देतो!

इंजि. संदीप नलावडे
अधीक्षक अभियंता
ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे

कोकण पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालय ठाणे येथील संपुर्ण स्टाफसोबत कार्यकारी संचालक इंजि. श्री अतुल कपोले साहेब

जलसंपदेतील ध्येयवादी अधिकारी

मी स्वत: जलसंपदा विभागात ३४ वर्षे सेवा केलेली आहे. यापैकी २५ वर्षांपेक्षा जास्त काळात मला श्री कपोलेजी यांच्या समवेत त्यांचा सहाय्यक अधिकारी म्हणून कामे करण्याचा योग आलेला आहे. आमचा बहुतांशी सेवा काळ १९९० ते २०२५ या काळातील आहे. श्री कपोलेजी यांची कार्यकारी अभियंता पदावरील प्रथम नियुक्ती वैजापूर जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथील नांदूर मधमेश्वर कालवा प्रकल्पावरील आहे. या विभागामध्ये त्यांच्या नियुक्तीपूर्वी मी सहाय्यक अभियंता श्रेणी १ म्हणून कार्यरत होतो. त्यांच्या या विभागातील तीन वर्षाच्या कालावधीमध्ये या कालवा प्रकल्पाची महत्वाची कामे पूर्ण झालेली आहेत. प्रथम नियुक्ति व पदावरील प्रथम अनुभव वयाच्या ३० व्या वर्षी कामे करण्याची त्यांची पध्दत, त्यावेळी खात्यात २५ वर्षे सेवा झालेल्या अभियंत्यांनाही लाजवणारी होती. कालवा बांधकामाचे विविध प्रकार जसे की Aquedhets, box Culvert यांची संकल्पने, सीडीओ नाशिक यांच्याकडून प्राप्त करुन घेणे व गुणवत्तापूर्वक कामाची गती कायम ठेवून पूर्ण करण्याचे आव्हान त्यांनी पार पाडले आहे. विभागातील बांधकाम प्रकारातील पुर्णत: तांत्रिक कामे कंत्राटदारांकडून पुर्ण करुन घेताना अधिकाऱ्यांसोबत विश्वासाने कामे करण्याची परंपरा त्यांनी सुरु केली. कंत्राटदाराबाबत समाजाचा दृष्टिकोन वेगळा असताना कंत्राटदार हे विकास कामाच्या रथाचे एक चाक व अधिकारी हे दुसरे चाक असते. याची समज ठेवून त्यांना सन्मानपूर्वक दर्जा देऊन कालवा बांधकामे उच्च दर्जाची करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

श्री कपोले यांच्या प्रथम नियुक्तिमध्येच त्यांच्या कामाच्या विशिष्ट शैलीमुळे विभागामध्ये ते दखलपात्र ठरले. त्यांच्या या कामांची दखल घेऊन त्यांची पुढील नियुक्ति तात्कालिन जलसंपदा मंत्र्याच्या जिल्ह्यामध्ये म्हणजेच तेव्हाचा उस्मानाबाद (धाराशिव) मध्ये करण्यात आली. या विभागामध्ये उमरगा तालुक्यातील ५० पेक्षा जास्त साठवण तलावाची कामे भूसंपादन, प्र.मा. प्राप्त करणे, अशा विविध कामामुळे बंद होती. या सर्व बंद कामातील अडचणी सोडवून ही कामे पूर्ण करणे तसेच १०० पेक्षा जास्त नवीन साठवण तलावांना प्र.मा. प्राप्त करुन भूसंपादनाच्या अडचणी सोडवून त्यानी उमरगा व तुळजापूर तालुक्यामध्ये प्रचंड पाणी साठवणुकीची कामे पूर्ण केली. या काळातील त्यांच्या झपाटलेल्या कार्यशैलीचा मी स्वत: साक्षीदार आहे.

श्री कपोलेजी यांनी कार्यकारी अभियंता पदावरील १० वर्षापेक्षा जास्त कालावधी मराठवाड्यासारख्या दुर्लक्षित भागामध्ये कामे केल्यानंतर त्यांची पुढील नियुक्ति पश्चिम महाराष्ट्रातील पुणे विभागामध्ये झाली. या विभागात त्यांनी पुढील १० वर्षे बहुतांशी सिंचन व्यवस्थापन विभागामध्ये कामे पार पाडली. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा सिंचन प्रश्न, सिंचनविषयक अडचणी आव्हानात्मक असत. लोकप्रतिनिधींकडून कामाचा प्रचंड दबाव असे. अशावेळी देखील या पुढारलेल्या विभागामध्ये त्यांनी आपल्या खास कार्यशैलीमुळे कामाचे मापदंडच बदलून टाकले.

विभागातील त्यांच्या उमेदीच्या काळात त्यांनी ज्या विभागामध्ये कामे केली त्या विभागातील पूर्वी पूर्ण केलेल्या कामापेक्षा दुप्पटीने कामे पार पाडली. त्यामुळेच त्यांच्यानंतर येणाऱ्या अधिकाऱ्यासाठी कामाचा मापदंड निश्चित होत गेला. विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या हाताखाली काम करताना नेहमी उत्साह व प्रेरणा मिळत गेली. त्यांची कार्यशैली प्रचंड प्रभावशाली होती. त्यांच्या हाताखाली कामे केल्यामुळे माझी निर्णयक्षमता वाढली. मला स्वतंत्रपणे निर्णय घेण्यासाठी संभ्रम किंवा ट्रेस आल्यास अशावेळी मी श्री कपोलेजींनी हा विषय कसा सोडविला असता असा विचार करुन निर्णय घेण्याची सवय लावली. अशाप्रकारे माझ्या सर्व सेवा काळामध्ये त्यांच्याप्रमाणे कामे करण्याबाबत प्रोत्साहन मिळत गेले.

जलसंपदा विभागामध्ये छोटी व फुटकळ कामे छोट्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता संघटना किंवा मजूर सहकारी सोसायटीकडून करायची पध्दत आहे. अशा छोट्या कंत्राटदारांसाठी श्री कपोलेजी देवदूत

ठरत असत. छोटी कामे कमी व छोटे कंत्राटदार जास्त असणे ही विभागामध्ये कायमची डोकेदुखी ठरते. परंतु याबाबतची आव्हाने ते कुशलतेने सांभाळत असत. अशा छोट्या कंत्राटदारांचे संसार आपल्या विभागामध्ये करीत असलेल्या कामामुळे उभे राहात असतात. याची जाणिव आम्हाला ते करुन देत असत. त्यांच्या अडचणी सोडविल्याप्रमाणे विविध विभागामध्ये त्यांचे असे हितचिंतक मोठ्या प्रमाणामध्ये आहेत. अशी फार वैशिष्टयपूर्ण कामे त्यांनी पार पाडली आहेत.

खात्यातील विकासाची कामे करताना लोकप्रतिनिधी, जिल्ह्यातील महसूल प्रमुख असलेले जिल्हाधिकारी व इतर अधिकारी यांच्याशी त्यांचे कायमच संबंध सौहार्दपूर्ण असायचे. धाराशिवमध्ये निवडणूक काळामधील एक महिन्याच्या कालावधीमध्ये येणारे वरिष्ठ निवडणूक अधिकाऱ्यांशीदेखील त्यांच्या पुढील कालावधीसाठी त्यांचे नेहमीसाठीचे नाते निर्माण करण्यात ते यशस्वी होत असत. लोकप्रतिनिधींशी चांगले संबंध ठेवल्यामुळे प्रकल्पाच्या भूसंपादन व पुनर्वसनविषयक अडचणी सोडवण्यासाठी त्यांना नेहमी मदत मिळत असे. तसेच सिंचन व्यवस्थापन विषयक लाभार्थी शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे त्यांना सहज शक्य होत असे. त्यामुळेच त्यांनी केलेल्या कामाचा वेगळाच ठसा त्या त्या विभागामध्ये कायमचा उमटविला गेला आहे.

विभागातील कामे करताना प्रशासकीय जीआर व मार्गदर्शन करणारे शासन परिपत्रक हे लाभार्थी शेतकऱ्यांची कामे करण्यासाठी आहेत. या परिपत्रकांचा संदर्भ देऊन अडचणी निर्माण करणाऱ्या अधिकाऱ्यांना सुचना देऊन परिपत्रकांचा बाऊ न करता नियमामध्ये बसवून कामे पूर्ण करण्यात त्यांचा हातखंडा होता.

जलसंपदा विभाग हा शेतकऱ्यांच्या पाणीविषयक बाबींचा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे विभागातील कामे केवळ तांत्रिकदृष्ट्या पूर्ण करण्याबरोबरच विभागातील कामे सामाजिक मंचावर हाताळली जाणे आवश्यक आहे याची त्याना कायम जाणिव असे. त्यामुळे एक तांत्रिक उच्चाधिकारी न रहाता नि:स्वार्थी व समर्पित भावाचा याबरोबर संगम झाल्याशिवाय कामे पूर्ण होऊ शकणार नाहीत अशी प्रगल्भता त्यांच्याकडे होती.

जलसंपदा विभागामध्ये २०१४-१५ मध्ये सिंचन श्वेतपत्रिका अनुषंगाने संभ्रम अवस्था निर्माण झाली होती. या काळात अधिकाऱ्यांच्या विश्वासाचे मोठ्या प्रमाणावर खच्चीकरण झाले होते. परंतु अशा वातावरणामध्ये विभागामध्ये सकारात्मक राहून परिवर्तन आणता येते. याची जाणिव त्यांना कायम होती. अशा चांगल्या कामाची समाज निश्चित दखल घेत असतो असा विश्वास त्यांनी शासन स्तरावर उपसचिव व सहसचिव असताना व महामंडळाचा सचिव दर्जाचा सर्वोच्च कार्यकारी संचालक म्हणून काम करताना विभागातील सर्व अधिकाऱ्यांमध्ये निर्माण करण्याचा नि:स्वार्थी व समर्पित भावनेने प्रयत्न केलेला आहे.

श्री कपोलेजी यांना ३० वर्षापेक्षा जास्त वर्षाच्या कालावधीमधील अशा विविध सकारात्मक विकास कामे करताना येत गेलेल्या आव्हानात्मक अनुभावातून कामे करण्यासाठी त्यांना त्यांच्या कुटुंबाकडून त्यांच्या सुविद्य पत्नीकडून कायम साथ मिळत गेलेली आहे. त्यांचा असा गौरवपूर्ण सेवाकाळ मला जवळून पहाण्याची संधी मिळत गेलेली आहे. त्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा व आरोग्यदायी आयुष्यासाठी सदिच्छा!



इंजि. मनोज अवलगावकर
सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता
छत्रपती संभाजीनगर

अतुल्य व्यक्तिमत्व

इंजि.श्री अतुल कपोले यांची त्यांच्या नावाप्रमाणेच इतरांशी तुलना करणे शक्य नाही असे ते अतुल्य व्यक्तिमत्व आहे. त्यांचे दांडगे तंत्रज्ञान, प्रशासनावरील मजबूत पकड, सामाजिक भान आणि जाणिव, शेतकऱ्यांचे, कर्मचाऱ्यांचे आणि कंत्राटदारांचे प्रश्न योग्य रितीने हाताळणे यामध्ये त्यांचा हातखंडा होता. आपल्या सहकाऱ्यांप्रती प्रेमाची व मदतीची भावना तसेच वरिष्ठांप्रति आदर त्यांच्यामध्ये ओतप्रोत भरलेला आहे.

खरे तर कपोले यांच्याशी माझा संबंध माझ्या सेवाकाळातील उत्तरार्धात मी औरंगाबाद येथे मुख्य अभियंता व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचा कार्यकारी संचालक असताना त्याचप्रमाणे पुणे येथे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा कार्यकारी संचालक असताना आला. मी औरंगाबादला असताना कपोले यांच्याकडे औरंगाबाद जिल्ह्यातील लघू, मध्यम व मोठे प्रकल्प इ. कामे होती. तसेच गोदावरी नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याची कामे आधी स्वयंचलित दरवाजासह निम्न पातळी बंधारे म्हणून हाती घेण्यात आली होती. पण सन २००५ व २००६ मध्ये गोदावरी नदीला आलेल्या मोठ्या पुरामध्ये असे स्वयंचलित दरवाजे कार्यक्षम असणार नाहीत असे निदर्शनास आले. त्यामुळे त्याचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यांमध्ये करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार हिरडपूरी आणि आपेगाव या उच्च पातळी बंधाऱ्याची कामे त्यांच्याकडे होती. त्यामुळे छोटे ऑटोमेटीक दरवाजे न बसवता विष्णुपुरी प्रकल्पासारखे मोठे दरवाजे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी श्री कपोले यांनी अतिशय मेहनत घेऊन प्रकल्प मार्गी लावला. त्यावेळी त्यांची जी प्रयत्नांची पराकाष्ठा होती, ती नजरेत भरण्यासासारखी होती. नाशिकच्या मेरीच्या अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन बंधाऱ्यांचे संकल्पन बदलून घेणे, त्यास शासन स्तरावरुन मान्यता घेणे, निविदेतील बदल करुन घेणे व नंतर त्यांचे यशस्वी कार्यान्विकरण करणे इत्यादी प्रचंड तांत्रिक क्षमतेच्या व खूप वेळ घेणाऱ्या प्रक्रिया होत्या. या सर्व प्रक्रियेसाठी वेळोवेळी विविध स्तरावरील अधिकाऱ्यांच्या प्रकल्प भेटी, बैठकांचे नियोजन व अंतिम मान्यता होईपर्यंतचा पाठपुरावा यामध्ये श्री कपोले अग्रेसर होते. या उच्च पातळी बंधाऱ्यांचे भूमिपूजन, उद्घाटन समारंभ कार्यान्वीकरण व कामाची पुर्तता यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या, मंत्री महोदयांच्या वारंवार भेटी होत असत. त्याचे तपशिलवार सुनियोजन करणे हे श्री कपोले यांचे कौशल्य दाखवणारे होते. केवळ त्यांच्यामुळेच या सर्व प्रक्रिया सुकर झाल्या.

श्री कपोले यांचा स्वभाव म्हणजे त्यांचा पॉजिटिव्ह अप्रोच ! कोणत्याही कामासाठी त्यांचा नकार नसायचा. अगदी सुईपासून ते विमानापर्यंत त्यांना कोणतेही काम सांगितले तरी ते कधीच नकार देत नसत. विशेष म्हणजे वाटेल ते करतील परंतु एकदा कबूल केलेले काम यशस्वी करुन दाखवतील असा त्यांचा स्वभाव आहे. त्यांचे व्यक्तिमत्व उमदे आहे. प्रत्येकाला ते आपलेसे वाटतात. कोणाची वैयक्तिक अडचण असली तरी ते स्वत:हून प्रयत्न करुन ती अडचण दूर करतील. त्यावेळी महामंडळाच्या कार्यालयासमोर आंदोलक वारंवार आंदोलन करायचे, उपोषणाला बसायचे. परंतु श्री कपोले आपल्या स्वभावानुसार त्यांच्याशी बोलून योग्य पध्दतीने त्यातून मार्ग काढत असत. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व सर्वप्रिय होते.

श्री कपोले यांच्या औरंगाबाद येथील कार्यकाळातच नांदूर मधमेश्वर प्रकल्पाला त्यांनी गती दिली. त्यांच्याच कार्यकाळात अनेक वर्षे रखडलेल्या नांदूर मधमेश्वर कालव्यातून प्रत्यक्ष पाण्याचे आवर्तन सोडून सिंचन सुरु केले. त्याद्वारे औरंगाबाद व सद्याच्या संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर व वैजापूर तालुक्यातील दुष्काळी भागाला पाणी उपलब्ध झाले. या भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन दिले. ही फार मोठी उपलब्धी आहे.

श्री कपोले यांच्याशी माझे कौटुंबिक सौहार्दपूर्ण संबंध आहेत. विशेषत: माझ्या मुलीच्या व मुलाच्या विवाह प्रसंगामध्ये त्यांनी व माझ्या कार्यालयीन

सहकाऱ्यांनी इतके उत्कृष्ट नियोजन केले होते की मला काहीही त्रास झाला नाही, अगदी कुटुंबातल्या सदस्यासारखे पाहूण्याच्या स्वागतासाठी कोणाला नेमायचे येथपासून ते पाहुण्यांना निरोप देण्यापर्यंत त्यांचे नियोजन होते. केवळ त्यांच्यामुळेच हे दोन्ही सोहळे विना विघ्न सुरळीत पार पडले. सांगण्याचा मुद्दा असा की कोणत्याही बारीक सारीक गोष्टी असो की मोठे कार्यक्रम असो कपोले यांचे नियोजन म्हणजे कार्यक्रम यशस्वी असे समीकरण होते.

श्री कपोले यांना सेवापूर्ती निमित्त खूप खूप शुभेच्छा! त्यांच्या आनंदी निरामय जीवनासाठी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियासाठी लाख लाख शुभेच्छा!

इंजि. दी.रं. कंदी
सेवानिवृत्त कार्यकारी संचालक
जलसंपदा विभाग, छ.संभाजीनगर

गोदावरी नदीवर आपेगाव आणि हिरडपूरी या दोन ठिकाणी श्री अतुल कपोले हे कार्यकार अभियंता असताना तयार झालेले उच्च पातळी बंधारे!

अतुल कपोले एक परिपूर्ण अभियंता

सन १९९८ हे वर्ष मराठवाड्यातील गंगापूर आणि वैजापूर तालुक्यासाठी सुवर्णकाळ ठरले आहे. कारण या वर्षी जवळपास २५ वर्षाहून अधिक काळ बंद पडलेल्या नांदूर मधमेश्वर कालव्याचे काम पुनश्च सुरु झाले आणि दुष्काळग्रस्त वैजापूर आणि गंगापूर तालुक्याला शेतीला पाणी मिळाले. साधारणपणे १९७४-७५ साली नांदूर मधमेश्वर कालव्याचे काम सुरु झाले होते. परंतु नाशिक आणि अहमदनगर (सद्याचा अहिल्यानगर) जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा, प्रकल्पग्रस्तांचा तसेच राजकारणी मंडळींचा या कालव्याला ठाम विरोध होता. कारण पश्चिम महाराष्ट्राचे पाणी या कालव्याद्वारे मराठवाड्यात घेऊन जाणार होते. शिवाय हा कालवा आमच्याच जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीतून जाणार, फळबागांचे आणि शेत पिकांचे नुकसान होणार. एवढे होऊनही त्याचे पाणी आम्हाला मिळणार नाही तर ते मराठवाड्याला मिळणार. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांचा आणि राजकारणी मंडळींचा या कालव्याला प्रचंड विरोध होता. त्यामुळेच या कालव्याचे काम २५ वर्षाहून अधिक काळ रखडले होते.

त्यानंतर सन १९९५ मध्ये राज्यामध्ये राजकीय सत्तांतर झाले. शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले. त्या सरकारमधील उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांची फार इच्छा होती की नांदूर मधमेश्वर कालव्याचे काम लवकरात लवकर पुर्ण झाले पाहिजे. त्यावेळी इंजि. शंकरराव नागरे हे अधीक्षक अभियंता होते. त्यांच्या दोघांच्या रेट्यामुळे या कामाला चालना मिळाली. त्यावेळी या कालव्याचे काम पुढे नेण्यासाठी गोपीनाथराव मुंडे यांच्या सुचनेनुसार इंजि. नागरेसाहेब यांनी माझी व त्यावेळी नुकतेच पदोन्नत झालेले कार्यकारी अभियंता श्री अतुल कपोले यांना नेमले.

नांदूर मधमेश्वर या कालव्याचे काम सुरु झाल्यानंतर ते काम सन २००० पूर्वी पूर्ण करण्याचे एक कठीण टार्गेट देण्यात आले होते. त्यामुळे कामाची गती खूप जास्त होती. माझ्याकडे या कालव्याचा पहिला टप्पा म्हणजे किमी. ० ते ३० हा होता तर त्या पुढचा टप्पा किमी.३१ ते ८० अतुल कपोले यांच्याकडे होता. त्यानंतरचा तिसरा टप्पा किमी ८१ ते ११४ हा पुन्हा माझ्याकडे होता. त्यामुळे आम्ही दोघेही झपाटल्यासारखे कामाला लागलो होतो. नाशिक आणि अहमदनगरचे शेतकरी आणि राजकारणी कालव्याच्या कामाला विरोध जोमाने करीत होते. कारण त्यांच्या भागातील शेतकरी क्षतिग्रस्त होणार होते. त्यावेळी आपले काम सुरु ठेवायचे तर लोकांचा विरोध मावळला पाहिजे होता. त्यासाठी राजकीय लोकांच्या सतत संपर्कात राहून प्रसंगी त्यांच्या पोटात शिरुन त्यांचा विरोध कमी करुन त्यांची मने वळविली. नांदूर मधमेश्वर कालव्याच्या मार्गात अनेक ठिकाणी बागायती शेती, काही ठिकाणी घरे, वस्त्या येत होत्या. त्यामुळे कालव्याच्या कामाला टोकांचा विरोध होत होता. परंतु हार न मानता श्री कपोले आणि मी आपापल्या परिने प्रकल्पग्रस्तांचे मन वळवून भूसंपादन पूर्नवसन आणि बांधकाम अशा तिन्ही आघाडीवर काम करीत होतो. आमच्या वरिष्ठांनी आमच्यावर खूप जास्त विश्वास टाकून या ठिकाणी नेमले होते.

अशा वातावरणात श्री अतुल कपोले यांनी अतिशय संयमाने प्रयत्न सुरु केले होते. प्रखर विरोध असतानाही त्यांनी शेतकरी आणि राजकीय नेते यांची मने वळविण्यात यश मिळविले होते. अहोरात्र मेहनत करुन अखेर नांदूर मधमेश्वर कालव्याचे पाणी मराठवाड्यातील वैजापूर आणि गंगापूर या दुष्काळी भागाला मिळाले. त्यावेळी या भागात अक्षरश: आनंदोत्सव साजरा केला होता.

त्यानंतर श्री अतुल कपोले यांची बदली एम.आय.डिव्हिजन औरंगाबाद येथे झाली. त्या ठिकाणी देखील त्यांनी त्याच रितीने झपाटल्यासारखे काम केले. वेगवेगळ्या कारणाने बंद पडलेल्या व लोकांनी आशा सोडलेल्या प्रकल्पावर लक्ष केंद्रित केले. त्या प्रलंबित प्रकल्पांच्या मार्गातील अडचणींचा अभ्यास केला आणि त्या अडचणी सोडविल्या. संभाजीनगर जिल्ह्यातील टेंभापूरी हा एक असाच रखडलेला प्रकल्प होता. हा

प्रकल्प ७० च्या दशकात सुरु झाला होता. परंतु त्या प्रकल्पाच्या पुनर्वसनाचा प्रश्न रखडल्याने तो प्रकल्प खोळंबला होता. शेवटी श्री कपोले यांनीच तो मार्गी लावला. त्यासाठी त्यांनी आधी तेथील पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावला. लोकांचा विश्वास संपादन केला. अशा रितीने टेंभापूरी प्रकल्प त्यांनी अतिशय कौशल्याने पुर्ण केला. अशीच तऱ्हा शिवना टाकळी प्रकल्पाची होती. तिथेही श्री अतुल कपोले यांनी आपले कौशल्य पणाला लावले आणि तोही प्रकल्प पुर्ण केला. श्री अतुल कपोले यांनी ज्या ज्या ठिकाणी अधिकारी म्हणून काम केले त्या त्या ठिकाणी त्यांनी वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प पुर्ण केले आहेत.

पुढे मी पुणे येथे महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा कार्यकारी संचालक असताना श्री अतुल कपोले पुणे पाटबंधारे विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता होते. या ठिकाणी दोन तीन वर्षे आम्ही सोबत काम केले. पुणे पाटबंधारे मंडळ हे राज्यातील सर्वात मोठे सिंचन क्षेत्र असलेले मंडळ आहे. जवळपास साडे सहा लाखाहून अधिक हेक्टर सिंचन क्षेत्र या मंडळाच्या अधिपत्याखाली आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण सिंचन क्षेत्रापैकी २५ टक्के सिंचन क्षेत्र या एका मंडळांतर्गत आहे. या ठिकाणी कार्यरत असताना श्री कपोले यांनी पुरंदर उपसा सिंचन योजना, जनाई सिरसाई उपसा सिंचन योजना मार्गी लावून पुर्णत्वास नेल्या. त्याचप्रमाणे नीरा डावा आणि उजवा कालव्याची कामे त्यांच्याच कार्यकाळात मार्गी लागली. एकीकडे अशा महत्वपूर्ण प्रकल्पांची कामे मार्गी लागली तर दुसरीकडे विक्रमी पाणीपट्टी वसुली, प्रोटोकॉल या आघाड्यांवरदेखील श्री कपोले यांनी आपला ठसा उमटविला होता. त्यामुळे एक कर्तव्यदक्ष आणि कार्यतत्पर अभियंता यांची दखल शासनाला घ्यावी लागली. शासनाने त्यांचा उत्कृष्ट अभियंता पुरस्काराने गौरव केला आहे.

पुणे येथे पुणे पाटबंधारे मंडळात अधीक्षक अभियंता असताना श्री कपोले यांनी पुणे आणि पिंपरी चिंचवड या महानगरांना करावा लागणारा पाणी पुरवठा आणि ग्रामिण भागातील सिंचनासाठी पुरवावे लागणारे पाणी यांचा ताळमेळ राखताना करावी लागणारी कसरत अतिशय समतोलपणे साधली.

कधी काळी पावसाचे प्रमाण कमी असेल तर ही किमया साधताना खूपच कसरत करावी लागत असे. यासाठी दोन्ही महानगरपालिकांचे आयुक्त आणि लोकप्रतिनिधी यांच्याशी समन्वय साधून पाणी वाटपाची कसरत ते लिलया पार करीत असत. त्यामधून त्यांचे दांडगे जनसंपर्काचे कौशल्य दिसून येते.संपुर्ण सेवा काळात त्यांनी अशाच प्रकारे स्वत:ला झोकून देऊन काम केले आणि आपला स्वत:चा एक वेगळा ठसा उमटविला. आता ते नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना पुढील आयुष्य आनंदी, सुखी आणि आरोग्यदायी जावो ही सदिच्छा!

इंजि. रा.ब. घोटे
सेवानिवृत्त कार्यकारी संचालक
जलसंपदा विभाग, महाराष्ट्र राज्य